# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९६ |
| वर्ष | : | पहिलें |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक
# दिशा
वर्ष पहिले/ अंक ५ / नोव्हेंबर १९९६



## संपादकीय

### मेंदू हरवतो तेव्हा

किणी नावाच्या व्यक्तीच्या दुसऱ्या शवविच्छेदनाच्या वेळी शवाचा मेंदू गहाळ असल्याचे निदर्शनास आले. या बातमीने खळबळ माजवून दिली. हा केवळ निष्काळजीपणा होता, की गुन्ह्याचा महत्त्वाचा पुरावा नष्ट करण्याचा तो प्रयत्न होता- हे काळच ठरवील. एकंदरीत शरीराच्या अवयवांत मेंदूला महत्त्वाचे स्थान आहे यात शंकाच नाही. फळांचा राजा जसा आंबा, तसा अवयवांचा राजा मेंदू. शरीराच्या जवळजवळ सर्वच ऐच्छिक व अनैच्छिक क्रियांचे नियंत्रण मेंदूकडून होत असल्यामुळेच, मेंदू म्हणजे शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव, असा समज झाला असण्याची शक्यता असावी. पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मन, चेतना, बुद्धी या अमूर्त कल्पनासुद्धा मेंदूतच कुठेतरी रेंगाळत असाव्यात हा विश्वास. व्यवहारात भाषाशास्त्रानेही या विश्वासावर शिक्कामोर्तब केलेले दिसते. शहाणपणाचा बुद्धीचा निर्देशांक मेंदूच्या क्षमतेच्या भाषेत मोजला जातो. आपल्या भाषेत मेंदूला पर्याय म्हणून डोके हा शब्द आपण सर्रास वापरतो. 'तुझे डोके ठिकाणावर आहे ना ? तो बिनडोक आहे. जरा डोकं चालव. डोकं का खोकं ? ती डोकेबाज आहे.' असे वाक्प्रचार व्यवहारातील बुद्धिचातुर्य किंवा मूर्खपणा दाखविण्यासाठी वापरण्यात येतात. थोडक्यात, माणसाची बुद्धी, स्मरणशक्ती, चातुर्य, सृजनशीलता या सर्वांचा उगम मेंदूतच असल्याचे आपण मानतो. मेंदूचे बुद्धीशी असलेले नाते सूर्याच्या प्रकाशाशी असलेल्या नात्याइतकेच स्पष्ट आहे. यामुळेच बुद्धीचे घटक मानले गेलेले तर्क, विश्लेषणक्षमता यांचा विकासही मेंदूतच होत असावा असा सिद्धांत आपण सहज मान्य करतो. या सगळ्याचा परिपाक म्हणून माणसाच्या शहाणपणाचे मोजमापसुद्धा बुद्ध्यांकावरून (I.Q.) केले जाऊ लागले. याउलट वेडेपणा, खुळेपणा, असंबद्धता, निर्बुद्धता या सर्व संकल्पना व्यावहारिक अपात्रता आणि मेंदूच्या क्षमतेत किंवा कार्यात काही त्रुटी असल्याचे दर्शवितात. आचार्य अत्र्यांच्या 'अधू मेंदूचा मधू' हा अग्रलेखाचा मथळा, राजकीय अव्यवहार्यता किंवा मूर्खपणा प्रत्यक्ष अग्रलेखातील मांडणीपेक्षा अधिक प्रभावीपणे सांगून गेला. भारतीय विचारसरणीत मती, प्रज्ञा, मेधा या बुद्धीच्या विकसित अवस्थासुद्धा मेंदूशी संबंध दाखवितात. राग, लोभ, मत्सर यांचे नियंत्रण व संतुलन याकरिता वेगळा शरीरावयव कुठेच दिसत नाही, त्याअर्थी ते कार्यही मेंदूच

करीत असला पाहिजे असे आपण मानतो. महत्त्वाच्या मनोव्यापारांचे नियंत्रण करणारा मेंदू हा शास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा आणि अभ्यासाचा विषय झाला नाही तरच नवल. पण आश्चर्य असे, की वेडा किंवा शहाणा यांच्या मेंदूत सकृतदर्शनी तरी काही भेद दिसत नाही! आणि म्हणूनच मेंदूच्या रचनेशी निगडित विकार, ज्याच्या प्रत्यक्ष कार्यावर परिणाम दिसू शकतो-त्यांचा अभ्यास व उपचार करणाऱ्यांना मेंदूतज्ज्ञ (Neurologist ) म्हणतात. तर वर्तणुकीतील बदल, की जे नित्याची जीवनपद्धती व व्यवहार यांत सर्वमान्य वागणुकीपेक्षा वेगळे वाटतात- त्यांच्यावर उपचार करणाऱ्यांना मानसोपचार तज्ज्ञ असे संबोधले जाते. मेंदू आणि मन असा येथे फरक केला गेला आहे. इथे मुख्य फरक हा आहे की वागणुकीतील हा बदल मेंदूच्या रचनेत बहुतेक वेळा दाखवता येत नाही. वस्तुनिष्ठतेच्या आहारी गेलेले पाश्चात्य तत्त्वज्ञान व त्यावर आधारित विज्ञान, रचना आणि कार्य व त्यांच्यांतील कार्यकारणभाव सिद्ध न करता आल्यामुळे मन आणि शरीर हे द्वैत ते मानतात. 'मनोव्यापार', वस्तू म्हणून दाखवता येत नसल्यामुळे मेंदूशी त्याचे नाते नाकारले गेले, ते विज्ञानकक्षेबाहेर गेले आणि अवैज्ञानिक समजले जाऊ लागले. याचीच परिणती म्हणून मन, (Mind) आत्मा (Soul), चेतना ( Consciousness) या संकल्पना नुसत्या नाकारल्याच गेल्या असे नाही, तर त्या अशास्त्रीय, अवैज्ञानिक ठरविल्या गेल्या. याउलट पौर्वात्य संस्कृतींमधून या संकल्पना नुसत्याच मानल्या गेल्या असे नाही, तर शरीर आणि मन यांचे अतूट नातेही त्यांनी मान्य केले. साहजिकच यामुळे उद्भवणाऱ्या संकल्पना, विकार, व्यवहार यांच्याकडे बघण्याची दृष्टीही दोन्ही संस्कृतींमध्ये भिन्न दिसून येते. याचेच प्रतिबिंब संपूर्ण मानवी व्यवहार, मानव-परिसर संबंध व मानव-प्राणी संबंध यांवर पडलेले दिसते. उत्क्रांतिवादामधे (Theory of Evolution) एका पेशीपासून बहुपेशीय रचनेचा क्रम अभिप्रेत धरला गेला आहे. सर्वप्राणिमात्रांमध्ये मानवाला श्रेष्ठत्वाचे स्थान त्याच्या मेंदूच्या आकारमानामुळे आहे. उत्क्रांतीमधे मानवाच्या एक किंवा दोन पावले मागे उभ्या असलेल्या माकड किंवा तत्सम प्राणिमात्रांचा विचार केला की, मानव आपल्या वागणुकीने आणि संस्कृतीने कां विकसित आहे हे आपल्याला सहज पटते. पण सहज पटणाऱ्या ह्या गोष्टी आजच्या भारतीयांच्या वागणूक आणि संस्कृतीबद्दल किती खऱ्या आहेत हे तपासूनच बघायला लागेल! अनुभवाने मनुष्य अधिक शहाणा होतो असे आपण मानतो. शिक्षणामुळे तो अधिक सहिष्णु, संयमशील आणि जबाबदार होतो असा आपला विश्वास आहे. मेंदूच्या रचनेत न दिसणारा, पण वर्तन किंवा वागणुकीमध्ये होणारा बदलही बहुतेक शास्त्रज्ञ उत्क्रांतिवादाची परिणती म्हणूनच मान्य करतात. मेंदूच्या विकसित अस्तित्वाचे ते लक्षण धरले याते. ढोंग, निर्लज्जपणा, धटिंगणशाही, खोटारडेपणा, अहमन्यपणा, लाचारी, लांगूलचालन इ. गोष्टी आजच्या जगातही असंस्कृत, असभ्य मानल्या जातात. परंतु आजचे सामाजिक आणि राजकीय नेतृत्व व साहित्य, नाट्य, चित्रकला इ. कलांमधील नीती आणि मूल्यांचा ह्रास उत्क्रांतीमध्ये भारतीय मनुष्य मागे आहे की काय अशी शंका निर्माण करीत आहे. शवविच्छेदनात एखांद्याचा मेंदू हरवणे आणि एकंदरीतच संशयास्पद मृत्यूच्या चौकशीबाबत निर्लज्ज दडपेगिरी करणे, हे भारताचे राजकीय आणि राष्ट्रीय चारित्र्य किती खालच्या दर्जाला पोचले आहे याचे जीवंत उदाहरण आहे. अशा प्रकरणाला जबाबदार असणाऱ्या मनोप्रवृत्ती व राजकीय व्यक्ती आणि त्यांना नियंत्रण करणारी शक्ती ही बधिर तरी असली पाहिजे किंवा या शक्तीचा अनुनय करणारी प्रजा तरी लाचार, निस्तेज आणि निर्बुध्द असली पाहिजे. मृत माणसाचा मेंदू हाही मेलेलाच असतो. पण जीवंत माणसाचा मेंदू जेंव्हा असभ्य, असंस्कृत वागणुकीचे प्रदर्शन करू लागतो, तेव्हां त्याच्या मेंदूच्या अस्तित्वाबद्दलच शंका येऊ लागते. आणि म्हणूनच किणीचा मेंदू हरवण्यापेक्षा या घटनामुळे भारतीयांचाच मेंदू हरवला आहे की काय ही भीती मन खिन्न करते.

•••

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष पहिले / अंक ५ / नोव्हेंबर १९९६

संपादक
डॉ. विजय वा. बेडेकर

सहसंपादक
श्री. प्रकाश ल. वैद्य

कार्यकारी संपादक
डॉ. जी. व्ही. कुलकर्णी

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

वार्षिक देणगी
रु. २०० /-

मुद्रक :
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरे – दि. पराडकर | ३ |
| ३) | British Policies & Indian Culture | डॉ. विजय वा. बेडेकर | ५ |
| ४) | व्यक्ति दोष, कर्करोग | श्री. प्रकाश ल. वैद्य | २५ |
| ५) | चित्रकार हुसेन यांची सरस्वती व द्रौपदी | श्रीमती दुर्गा भागवत | २९ |
| ७) | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (३) | डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी | ३१ |
| ६) | दिवंगत व्यक्तींकडून संप्रेषण : एक नमुनेदार प्रयोग | श्री. वसंत वि. अकोलकर | ३४ |
| ८) | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३७ |

# लेखक - परिचय

१. ***डॉ. विजय वा. बेडेकर***

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर***

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधून निवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती, संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. ***श्री. प्रकाश ल. वैद्य***

आय. आय. टी. पवई, मुंबई, येथून बी.टेक (इलेक्ट्रिकल) ही पदवी संपादन, व्यवसाय -इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात सल्लागार, विशेष आवड आणि संशोधन : भाषा आणि संगीत या विषयांत.

४. ***श्रीमती दुर्गा भागवत***

वय ८७ वर्षे, संस्कृत, मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्राच्या गाढ्या अभ्यासक. अनेक पुस्तकांच्या लेखिका, विपुल संशोधन - निबंध प्रकाशित. मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा. आपल्या परखड आणि प्रामाणिक मतप्रदर्शनाकरिता प्रसिद्ध.

५. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

६. ***श्री. वसंत वि. अकोलकर***

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५१) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६३) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

७. ***प्रा. मोहन पाठक***

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

*आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला ।*
*यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत् ॥*
*आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ।*
*आशा येषां दासी तेषां दासायते लोकः ॥*
*आशा नाम नदी मनोरथजला तृष्णातरङ्गाकुला ।*
*रागग्राहवती वितर्कविहगा धैर्यद्रुमध्वंसिनी ॥*
*मोहावर्तसुदुस्तुरातिगहना प्रोतुङ्गचिन्तातटी ।*
*तस्याः पारगता विशुद्धमनसो नन्दन्ति योगीश्वराः ॥*

**श्री. मोरेश्वर दि. पराडकर**

मनुष्याच्या जीवनात आशेला फार महत्त्व असते, किंबहुना तीवरच तो जगत असतो; निरनिराळी स्वप्ने मनाशी रंगवत असतो; उज्ज्वल भविष्याचे इमले मनोमन उभारीत असतो आणि प्राप्त झालेल्या प्रतिकूल परिस्थितीला सामोरा जातो, संकटांशी झगडत असतो. विजयाची आशा नसेल तर सैनिकांचा विश्वास डळमळेल आणि त्यांचे शत्रूला नेस्तनाबूद करण्याचे सामर्थ्य कमी होईल. आजच्या स्पर्धेच्या युगात परीक्षेत नव्वद टक्क्यांपेक्षाही अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होण्याच्या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नाच्या मुळाशी ही आशाच नसते का ? म्हणूनच या सुभाषितकाराने आशा म्हणजे निरनिराळी आश्चर्ये घडवून आणणारी, म्हणूनच विस्मयकारक साखळी असे सुरवातीलाच म्हणून टाकले, आणि आश्चर्य कोणते याचे उत्तर देताना दुसऱ्या ओळीत खुबीदारपणाने सांगितले, 'हिच्या साहाय्याने जखडले गेलेले, बांधले गेलेले लोक धावत असताना निरनिराळी कामे उत्साहाने करीत असतात. वस्तुतः साखळी किंवा साखळदंड माणसावर बंधन आणतो, त्याला बांधून टाकतो; पण ही आशारूपी साखळी विस्मयाची खाण आहे, कारण हिने बांधलेला म्हणजेच हिच्यामुळे प्रेरणा मिळालेला माणूस क्रियाशील असतो. वस्तुतः वेगाने दौडत असतो. आणि या आशेने ज्यांना सोडले ते मुक्तीचा आनंद अनुभवत नाहीत; उलट पांगळ्या माणसाप्रमाणे बसून राहतात; खचून जातात. त्यांची कामाची उभारीच नाहीशी होते. 'बद्धाः प्रधावन्ति' आणि 'मुक्ताः पङ्गुवत् तिष्ठन्ति' या शब्दांमधे वरवर विरोध वाटतो खरा पण हे जीवनातले एक सत्य आहे याबद्दल संशय येण्याचे कारण नाही. सर्वांच्या अनुभवाला येणारी ही गोष्ट भर्तृहरीने मोजक्या शब्दांत सांगून टाकली हे मान्य केले पाहिजे.

हे लक्षात घेऊन 'कवितामृतकूप' नावाच्या सुभाषित -संग्रहात या आशेचा महिमा थोडा निराळ्या पद्धतीने सांगितला. या आशेचे जे दास ते सर्व जगाचे दास. कारण सर्व जगाच्या आकांक्षा पूर्ण करण्याचा उद्योग त्यांना करावा लागतो. निवडणुकांचेच उदाहरण घ्या. निवडणुकीच्या रिंगणात उतरणारी प्रत्येक व्यक्ती विजय मिळविण्याच्या इच्छेनेच सर्व मतदारांना खूश करण्याचा प्रयत्न करते. त्यांना अनेक आश्वासने देते; 'मी तुमची सेवा करायला बांधलेलो आहे' असे शपथेवर सांगत असते म्हणजेच निवडून येईन या आशेची दास असते; मग सर्वांचे दास्य (तात्पुरते का होईना) पतकरते. नौकरीत बदली मिळेल या आशेने संबंधित अधिकाऱ्याची मर्जी हा आशेचा दास संभाळीत असतो. त्यांची प्रसंगी खुशामत करताना दिसतो, त्यांच्या अंगी नसलेले गुणही दाखवतो; याचा अनुभव व्यवहारात येतोच ना ! याउलट ज्यांनी आशेचा मुलाहिजा ठेवला नाही किंबहुना तिलाच आपली दासी बनवलेले असते त्यांना अशी बंधने स्वीकारण्याचे कारण नसते. अशा व्यक्तींना खुशामत करण्याची जरूरी कशी भासणार ? मग तर त्यांच्या बाबतीत लोकच त्यांचे सेवक बनतात याला कारण अर्थातच त्यांची निःस्पृहता. 'निःस्पृहस्य तृणं जगत्' म्हणतात ते उगीच नव्हे. आशा नाही म्हणून अपेक्षा नाही आणि अपेक्षा नसलेली व्यक्ती निःशङ्कपणाने, निर्धास्तपणाने जगू शकते. म्हणूनच अपेक्षा बाळगणाऱ्यांचे जग हे त्यांचे किंकर बनते. 'दासायते लोकः' यात 'दासायते' हा शब्द मोठा समर्पक आहे. 'दास व आचरति' हे त्याचे स्पष्टीकरण म्हणजे नोकर

असणाऱ्याचा प्रश्न नाही, नोकरासारखे वागण्याचा प्रश्न आहे. आशेला आपली बटीक जे बनवू शकतात त्यांची जरब असते. त्यांच्यापुढे आशेचे गुलाम असले त्यांना नमावेच लागते.

परंतु हे सोपे मात्र नाही; किंबहुना फारच कठीण कसे हे स्पष्ट करताना जीवनातल्या अनुभवाने संपन्न असणारा संस्कृत कवी भर्तृहरी एक सम्पूर्ण रूपकच बांधतो. त्याने आशेला नदी म्हटले आणि ती किती खोल आहे याचे मोठे प्रत्ययकारी वर्णन आपल्या नीतिशतकात केले. या नदीचे पाणी हे मनुष्यांच्या मनोरथांनी बनलेले असते. मानवी मनाचा थांग लागणे कठीण आहे. मनावर रथाचे रूपक करून मनाच्या गतीची कल्पना आणून दिली. मनाला अप्राप्य अशी वस्तूच नाही. 'मनोरथनामगतिर्न विद्यते' असे कालिदासाने म्हणूनच ठेवले. 'मनोरथजला' हा शब्दच या रूपकात मानवी मनाची खोली सुचवणारा आहे. या नदीत निरनिराळे तरङ्ग -ही उद्भवतात हेच तृष्णारूपी तरङ्ग. तृष्णा म्हणजे हाव, आसक्ती. इंग्रजीतला want हा शब्द इथे आठवतो. मनुष्याचे मन या तरङ्गांनी अगदी 'आकुल' म्हणजे काठोकाठ भरलेले असते या नदीत नुसते तरङ्ग (म्हणजे लाटा ,पण लाट हा शब्द -ही जरा तरङ्गाचा अनावश्यक विस्तार करणारा आहे ) ही नसतात तर मगरी, सुसरी ही असतात. त्या कोणत्या ? तर मानवाच्या मनातले प्रमाथी विकार. रागरूपी ग्राहक हे भर्तृहरीचे रूपक मनात उठणाऱ्या हर्षामर्षांच्या क्षोभाचे सूचक आहे. या मगरी-सुसरींच्या आधारानेच माणूस अनेक तर्कवितर्क करीत असतो; यांना 'विहग' म्हणजे आकाशात उठणारे पक्षी म्हणून वस्तुतः भर्तृहरीने बहार केलेली आहे. या नदीचे मनोरथरूपी पाणी पिण्याचे कधी न संपणारे काम हे विर्तकरूपी पक्षी करीत असतात आणि आकाशात उडत असतात. मनुष्याच्या तर्कात विविधता हि असते आणि विसंगतीही आढळते. या दोन्हींचे स्वरूप 'वितर्क विहगाः' या रूपकात कवीने स्पष्ट केले.

अशा रीतीने तृष्णारूपी तरङ्गांनी आकुल होणाऱ्या रागरूपी मगरी-सुसरींच्या जबड्यात निरनिराळ्या तर्करूपी पक्ष्यांच्या उड्डाणांनी शबल होणाऱ्या आशारूपी नदीत बुडणाऱ्या माणसाचे धैर्य टिकून कसे राहणार ? या धैर्याला भर्तृहरीने नदीच्या तटावर असणारे वृक्ष असे म्हटले. आणि ही नदी या तटावरच्या वृक्षांना उन्मळून टाकते किंबहुना असे करणे हा या नदीचा स्वभावच आहे. वेगाने वाहणाऱ्या आणि स्वभावतःच खोल असलेल्या या नदीच्या बांधावर असणारे म्हणजेच वृक्ष म्हणजेच धैर्य किंवा संयम. प्रमाथी विकारांच्या दुनियेत सतत राहूनही त्यांच्या आहारी न जाणे याचेच नाव धैर्य. भर्तृहरीने शहाण्या म्हणजे धैर्य असणाऱ्या व्यक्तींचे वर्णन करतांना 'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एक धीराः ' असे म्हणून ठेवले यांतले मर्मही प्रवाहात राहून पाय घसरून देण्यात आहे. एवढ्यानेही या नदीची संपूर्ण कल्पना येत नाही म्हणून तिसऱ्या ओळीत या नदीतल्या भोवऱ्यांचीही कल्पना आणून दिली. मोहाचे भोवरे या नदीत पुष्कळ त्यामुळे अट्टल पोहणाऱ्यांनाही हे भोवरे भेदून जाणे मुश्किल होऊन बसते. आशारूपी नदीच्या खोलीची यथार्थ कल्पना आणून देणारा, किंबहुना त्या नदीची खोली जाणवून देणारा हा अन्वर्थक शब्द. तटावर असणाऱ्या वृक्षांची कल्पना आली, परंतु या नदीचे दोन तट कोणते हे स्पष्ट करतांना हा कवी म्हणतो प्रोतुङ्ग म्हणजे अगदी उंचीमुळे गगनाला भिडणाऱ्या चिन्ता हेच हिचे तट. 'सजीवं दहते चिन्ता' हे सुवचनही प्रत्येकाच्या अनुभवाचा विषय. आशेने प्रेरित झालेल्या माणसाला तर निरनिराळ्या प्रकारच्या विवंचना भेडसावीत असतात. या चिन्ता हेच जिचे तट अशी ही तटिनी म्हणजेच आशारूपी नदी. ही तरून जाणे भल्याभल्यांनाही आह्वान देणारे. या नदीच्या पैलतीरावरही जाऊशकणारे योग्यांचे ईश्वरच. त्याचेही कारण सांगण्याचे भर्तृहरी विसरला नाही. 'विशुद्धमनसः योगीश्वराः ' हे योगीश्वर मनाचे शुद्ध, पारदर्शी स्फटिकासारखे. यामुळेच ही अत्यंत खोल अशी आशारूपी नदी ते तरून जाऊ शकतात. त्यांना 'ते योगीश्वराः नन्दन्ति' या शब्दांत मानाचा मुजरा करून भर्तृहरीने या श्लोकाचा मोठा प्रभावी समारोप केलेला आहे. व्यवहारातले वास्तव हे किती कठोर असते याची मोजक्या शब्दात जाणीव करून देऊन तत्त्वस्पर्शी ज्ञात्यांना म्हणजे योगीश्वरांना मानाचा अर्घ्य देणे हे या सुभाषिताचे विलोभनीय वैशिष्ट्यच. थोडक्यात पुष्कळ अर्थ व्यक्त करं शकणाऱ्या सामासिक संस्कृत भाषेचे हि सामर्थ्य व्यक्त करणारा 'भर्तृहरि' हा संस्कृत शारदेच्या दरबारांतील मानकरी.

•••

# " British Policies & Indian Culture "

**Dr. V. V. Bedekar**

*( Originaly presented as a small paper before Indian & Foregin Scholars in an informed meeting. The paper was further modified & was written as an introduction in the book "Historical Truth & Untruth exposed" published in 1991)*

I sincerely thank Shree Jeevan Kulkarni for having written these articles which were first published in the ***Masurashram Patrika***, Mumbai. These articles are the outcome of his research and insight, which tell us an altogether different story about our history and historians. Shree Jeevan Kulkarni has written with adequate quotations, and almost all the books which he has cited are available in the Asiatic Society Library, Mumbai.

Our politicians, historians, sociologists, universities and the sacred media seem to have been convinced that the biggest obstruction in our progress is our past and religion, and unless we divorce with those, we cannot become logical, rational and scientific, which is the key to progress and success in the modern world!

Shree Jeevan Kulkarni's articles may shock many, and even the best of his sympathisers may find difficulty in digesting the revelations of his writings. There is nothing unnatural about it. We are continuously fed on misinformation, and there is a deliberate attempt to distort our social history, by ideologically motivated media,

The canvas of history covers thousands of years.

Achievements of any civilisation are judged by culture, literature, arts and sciences it has created and ecological and environmental conditions it has effectively produced. Strangely enough, the thinkers of the world have now realized the disastrous ecological condition of the world in which we live today. Scientists are also of the opinion that this disastrous condition is due to the same science, which is thought to have brought progress to mankind. India, which, according to our sociologists, politicians and the media, has not contributed anything worthwhile to modern progress and could have doubtfully achieved anything in the past.

But then what was the reason - from Max Muller to Schrodinger, who felt like taking inspiration from the cultural achievements and scriptures of India of the past? Who was Panini? How the writings of Kalidas were created ? How Bharata could write his *Natyashastra* and the country could reach the pinnacle of performing art ? What about Indian achievements in Mathematics and Astronomy ? What about paintings of Ajanta and Ellora and intricately carved temple architecture throughout the length and breadth of the country ? What about Yoga and spiritual achievements of the Hindus and the fully developed medical science - Ayurveda ? What about the writings of

Kautilya and Vatsyayana ? What about the achievements in Textiles, Chemistry and Metallurgy ? If, according to our media and great Marxist historians, our people in the past had no business other than indulging in exploitation of all kinds, how these achievements were possible ? One cannot forget,a society needs optimum social, economic and cultural stability for any kind of creativity to take form and shape.

When are we going to realise that our past history is being distorted and our past has fallen a prey to the false propaganda of socialist ideology ? Modern sciences like anthropology, sociology, history etc., have been used as tools to mutilate our history and culture. This has successfully made us hate our own past, culture and religion.

It will be worthwhile to investigate how this was and is achieved , and also the role played by the British in their different capacities - as missionaries, administrators, politicians, traders, reformers, sympathisers etc., and the effect and the deep impact it has left on Indian mind and culture.

We begin our investigation with missionaries and British administrative machinery, and their contribution in this process.

The missionaries and the British administrators, who studied our past, had some interest in distorting our history. Missionaries were bent upon exploiting the shortcomings that had crept in our religious practices due to lack of adequate guidance and also due to factors like foreign invasions, wars and alien tyrannical rule, coupled with conversions. The British administrators, in order to justify their presence in India wanted to show that Indians were not fit for self-rule. To achieve this end, they wanted to implant a totally alien western system of governance by uprooting the then existing age-old indigenous systems, which practically included the total life of the governed. Those included the systems of law, education,, medicine, revenue and land-tenure etc. To appreciate these two factors viz. the role of missionaries and the British administrators, in mutilating our history; and uprooting all our systems in order to align them with their own social, cultural, economic and spiritual thinking and the way of life, one has to read history afresh and between the lines.

## BRITISH POLICIES AND EDUCATION

### (A) Missionaries

In 1813, the Charter of the East India Company was renewed. The British Parliament insisted, in spite of opposition from the Directors of the Company, on inserting a clause in the Charter, giving missionaries full freedom to settle and work in India. J.N. Farquhar notes this event and has commented that 'soon afterwards there was a great influx of missionaries into the country.' (J.N. Farquhar, Modern Religious Movements in India, first published in England in 1914. First Indian edition pub. by Munshiram Manoharlal, Dehli 1967)

The missionaries opened schools and hospitals, orphanages etc. Education was not used by missionaries out of any humanitarian motive, but they used education as a vehicle to westernise the indigenous people in every aspect of human life.

The tragedy is that, the systems of education, law, revenue, land-tenure etc., introduced by the British and reforms initiated by the missionaries in our religion, have truly helped them to shape an Indian exactly dreamt of by Macauly, the father of English system of education in India. His dream was-

*"We must do our best to form a class who may be interpreters between us and the millions whom we govern, a class of persons Indian in blood and colour, but English in taste, in opinions, words and intellect."*

-B.D. Basu, *History of Education in India under the Rule of the East India Company*, pp. 91-92

J. N. Farquhar, while writing about Christian missionaries in the last decades of the 18th and early decades of the 19th centuries says :

*"Then it was not long before the wiser men both in Missions and in the Government began to see that, for the immeasurable task to be accomplished, it was most necessary that missions should take advantage of the advancing policy of the government and that government should use missions as civilising ally. For the sake of progress of India, co-operation was indispensable."*

J. N. Faruahar, *op.cit, p.7*

It throws light on how both the agencies - the missionaries and administrators worked in close coordination to each other's advantage.

These events and dates have a cardinal importance in Indian history. Because it is from 1820 to 1840 A.D. that all arms of Government, which were needed to control Indian society firmly as per their designs, were instituted. Farquhar has classically described the result of the new educational policy in the following words :

*"The new educational policy of the Government created during these years the modern educated class of India. These are men who think and speak in English habitually, who are proud of their citizenship in the British Empire, who are devoted to English literature, and whose intellectual life has been almost entirely formed by the thought of the West, large numbers of them enter government services, while the rest practise law, medicine or the teaching, or take to journalism or business. We must also note that the powerful excitement which has sufficed to create the religious movements we have to deal with is almost entirely confined to those who have had an English education." (J. N. Farquhar, op.cit p.21)*

These observations of Farquhar were made while delivering a series of lectures in 1912, practically after a century of the event of manipulating and introducing English system of Education in India. He talked of English educated Indians around 1850.

A graphic image of English education Indian of the early 20th century is given by Anand K. Coomarswamy in 1908. He writes :

*"Speak to the ordinary graduate of an Indian University, or a student from Ceylon, of the ideals of the Mahabharata - he will hasten to display his knowledge of Shakespeare : talk to him of religious philosophy - you find that he is an atheist of the crude type common in Europe a*

*generation ago, and that not only has he no religion, but is lacking in philosophy as the average Englishman : talk to him of Indian music - he will produce a gramophone or a harmonium, and inflict upon you one or both; talk to him of Indian dress or jewellery - he will tell you that they are uncivilised and barbaric; talk to him of Indian art-it is news to him that such a thing exists; ask him to translate for you a letter written in his own mothertongue - he does not know it. He is indeed a stranger in his own land." (Modern Review, Calcutta, Vol. 4, Oct. 1908, p. 338)*

These remarkable results were not achieved by fair means, but by dubious and fraudulent tactics. We will see next how some of the prominent missionaries in Calcutta, Benares and Serampore manipulated the syllabus of the new educational institutions started for this purpose. Hundreds of Indians poured out of these institutions.

William Carey (1767-1837) William Hodge Mill (1792-1853) and John Muir (1810-1882) are some of the pioneers in this field and have played a remarkable role in constructing the psychology of the Indians (of course as per the vision of Macaulay) coming out of the Institutions of English education. All these three Oriental scholars were acclaimed Sanskrit scholars, who have done some original work in translating Christian scriptures and theology into Sanskrit and *vice versa*.

Richard Fox Young in his book has given some important information in this regard. He writes about William Carey :

*"In order to understand what he [Carey] wanted to do with India's sacred language, one must note that Carey had two reasons for being interested in its utilization for evangelism. First, he saw that Sanskrit acted as a stabilising force upon the unsettled dialects amidst which he worked. Second, he was intransigently opposed to Brahminical privileges, one of which was hegemony over Sanskrit."*

- Richard Fox Young *Resistant Hinduism* : Sanskrit sources on anti-christian apologetics in early nineteenth-century India p.33 published by The De Nobili Research Library, Vienna (1981)

Carey, Who was an English Baptist Missionary, founded the famous Serampore College in 1818. It was his ambition to turn Serampore into "Christian Benares". The syllabus of the course in Serampore College was framed with the above object in view. Writes Young further :

*"His intentions were also avowedly aggressive, a direct result of conflicts with Brahmins. According to his plans, Hindu literature could be placed in disadvantageous juxtaposition with the Gospel, a task which would be done effectively only by evangelists acquainted with the original sources of both religions."*

Young quotes Carey himself to make clear the intentions of Carey's exercises :

*"To gain the ear of those who are thus deceived it is necessary for them to believe that the speaker has a superior knowledge of the subject. In these circumstances a knowledge of Sanskrit is valuable. As the person thus misled, perhaps a Brahmun, deems this a most*

*important part of knowledge, if the advocate of truth be deficient therein, he labours against the hill; presumption is altogether against him."*

-William Carey, On encouraging the cultivation of Sanskrit among the natives of India, 1822 F.L. Quarterly 2-131-37)

William H. Mill was appointed as Principal of Bishop's College, Calcutta, which was founded in 1820 by the Society for the Propagation of Gospel (London). Mills and H.H. Wilson have composed evangelical tracts in Sanskrit. According to Mill's viewpoint, Hinduism consisted of 'Sublime precepts of spiritual abstractions' overlaid with 'monstrous and demoralising legends', Raja Ram Mohan Roy and other Indian critics of traditional Hinduism shared these very views.

John Muir came to Calcutta somewhere in 1827-28. He was a firm believer in Christianity and its propagation, and was an outstanding scholar in Sanskrit. He served the East India Company in various administrative departments in North-West Frontier Province. His knowledge gave him an opportunity to work in the Sanskrit Department of the famous Benares College (1844-45). Writes Young-

*"Muir's manipulation of the Philosophy curriculum aimed at depriving the* ***dorsanas*** *of all vestiges of revelation. This he attempted to do by forcing pandits to abandon their way of teaching, which he thought was tantamount to indoctrination, and to adopt free debate instead."*

Richard Fox Young, *op.cit. p.53*

Similarly, Sanskrit scholars in Bombay and Madras presidencies and other parts of the country were venturing into educational activity with a firm belief, overtly and covertly, for propagation of Christianity in India.

### (B) Administrators

After seeing the vital role played by missionaries in the field of education, we can now turn our attention to the chief architects of this policy-British administrators. :

We have already seen that these achievements of English education were the results of a calculated, well-conceived, deliberate, well-planned, well-engineered and a foresighted policy. The framers of this policy were sagacious statesmen, thorough patriots and shrewd visionaies. The strong commonsense which they possessed was of an extraordinarily high calibre.

Macaulay. no doubt, surpasses all others. However, Macaulay's brother-in-law, Sir Charles E. Trevelyan, and Lord William Bentinck are also equal architects of this policy. These officers had a strong English superiority complex and utter disregard and disrespect, nay hatred towards Indians and Indian culture. They knew nothing about Indian culture or education, customs, arts, sciences; and what they knew were either the drawbacks, or misinformation gathered from unauthoritative sources and hearsay.

However, occasional sympathies and reformism shown by the British should never camouflage their real and secret intentions. Macaulay was the chief architect of educational policy, and it was Lord William Bentinck who introduced English

as the Court language in India. He was very clear in his intentions of introducing English as Court language as seen in the letter of Court of Directors dated 29th July 1830 to Bengal :

"... *From the meditated change in the language of public business, including judicial proceedings, you anticipate several collateral advantages, the principal of which is, that the judge, or other European officer, being thoroughly acquainted with the language in which the proceedings are held, will be, and appear to be, less dependent upon the natives by whom he is surrounded, and those natives will in consequence, enjoy fewer opportunities of bribery or other undue emolument.*"

Thus the interests of millions of Indians were sacrificed for the convenience and profit of a few Englishmen. Lord Bentinck was never in favour of educating the people of India in the real sense, but he preferred anglicising them, as he apprehended danger in spreading knowledge in this country. Bentinck's opinion is recorded in his Minutes dated 13th March, 1835. However, Charles Metcalf, Governor General of India, disagreeing with the views of Bentinck observed in his own Minute dated 16th May, 1835 :

"... *His Lordship [ Bentinck], however, sees further danger in the spread of knowledge and the operations of the Press. I do not for my own part, anticipate danger as certain consequence from these causes.*"

-B. D. Basu, *op. cit.*p.67

The third architect, Sir Charles E. Trevelyan, brother-in-law of Macaulay, is so clear and explicit in his ideas, that even his enemies will have to appreciate his candidness so explicit in his ideas, foresight, vision and judgement. In his Evidence given before Select Committee of the House of Lords on the Government of Indian Territories, on 23rd June, 1853,he says

"... *the effect of training in European learning is to give an entirely new turn to the native mind. The young men educated in this way cease to strive after independence according to the original Native model, and aim at, improving the inhabitants of the country according to the English model, with the ultimate result of establishing constitutional self-government. They cease to regard us as enemies and usurpers, and they look upon us as friends and patrons, and powerful beneficent persons, under whose protection all they have most at heart for the regeneration of their country will gradually be worked out ....*"

The following extracts from a paper submitted to the Parliamentary Committee of 1853 on Indian territories titled "The Political Tendency of the Different Systems of Education in use in India" by Sir Charles E. Trevelyan, brother-in-law of Macaulay, speak volumes about the intentions in introducing the English system of education in India. This document is so important that every student, of history of English system of education in India must know it. He says :

"....*The spirit of English literature, on the other hand, cannot but be favourable to the English connection. Familiarly acquainted with us by means*

*of our literature, the Indian youth almost cease to regard us as foreigners. They speak of great man with the same enthusiasm as we do. Educated in the same way, interested in the same objects, engaged in the same pursuits with ourselves, they become more English than Hindoos, just as the Roman provincial became more Roman than Gauls or Italians... Every community has its ideas of securing the universal principal, in some shape or other, is in a state of constant activity; and if it be not enlisted on our side, it must be arrayed against us. As long as the native are left to brood over their former independence, and total expulsion of the English... 'It is only by the infusion of European ideas, that a new direction can be given to the national institutions on the English model.... The existing connection between two such distant countries as England and India, cannot, in the nature of things, be permanent; no effort of policy can prevent the natives from ultimately regaining their independence.*

*But there are two ways of arriving at this point. One of these is, through the medium of revolution; the other, through that of reform. In one, the forward movement is sudden and violent, in the other, it is gradual and peaceable. One must end in a complete alienation of mind and separation of interest between ourselves and the natives; the other in a permanent alliance, founded on mutual benefits and goodwill... The only means at our disposal for preventing the one and securing the other class of result is, to set the natives on a process of European improvement, to which they are already sufficiently inclined. They will then cease to desire and aim at independence on the old Indian footing. A sudden change will then be impossible and a long continuance of our present connection with India will even be assured to us...The natives will not rise against us, because we shall stoop to raise them; there will be no reaction, because there will be no pressure; the national activity will be fully and harmlessly employed in acquiring and diffusing European knowledge, and naturalising European institutions. The educated classes, knowing that the evation of their country on these principles can only be worked out under protection, will naturally cling to us. They even now do so... and it will then be necessary to modify the political institutions to suit the increased intelligence of the people, and their capacity for self - government ... In following this course we should be buying no new experiment. The Romans at once civilized the nations of Europe, and attached them to their rule by Romanising them; or, in other words, by educating them in the Roman literature and arts , and teaching them to emulate their conquerors instead of opposing them. Acquisitions made by superiority in war, were consolidated by superiority in the arts of peace; and the remembrance of the original violence was lost in that of the benefits which resulted from it. The provincial of Itlay, Spain, Africa and Gaul, having no ambition except to imitate the Romans, and to share their privileges with them, remained to the last faithful subjects of the Empire;...The Indian will, I hope soon stand in the same position towards us in which we once stood towards the Romans. Tacitus informs us, that it was the*

*policy of Julius Agricola to instruct the sons of the leading men among the Britons in the literature and science of Rome and give them a taste for refinements of Roman civilisation. We all know how well this plan answered . From being obstinate enemies, the Britons soon became attached and confiding friends; and they made more strenuous efforts to retain the Romans, than their ancestors had done to resist their invasion. It will be a shame to us if, with our greatly superior advantages, we also do not make our premature departure be dreaded as a calamity..."*

Macaulay had arrived in India in 1834, and he wrote his famous Minute in 1835. No Indian can read Macaulay's Minute without feeling deep humiliation, as Macaulay not only abused but insulted Indians. Macaulay knew nothing of Indian history and Indian literature. He was not acquainted with any branch of Indian thoughts. Knowing all this, Bentinck chose him to decide the very important controversy between the occidentalists and the orientalists. It was a worse selection that ever could have been made.

The famous Minute which Macaulay wrote in 1835, remained unpublished till 1864. His nephew Sir George Otto Trevelyan first published it in Macmillan's Magazine of May, 1864. Macaulay proudly records:

*" We are at present a Board for Printing Books which are of less value than the paper on which they are printed was when it was blank, and for giving artificial encouragements to absurd history, absurd metaphysics, absurd physics, and absurd theology."*

Macaulay's motives behind his educational policy were not only political but religious as well , as revealed in his letter of 1836 addressed to his father.

*" ...... The effect of this education on the Hindus is prodigious. No Hindu who has received an English education ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy, but many profess themselves pure Deists and some embrace Christianity. It is my firm belief if our plans of education are followed up there will not be a single idolator among the respectable classes in Bengal thirty years hence."*

The comment on this letter by *The Indian Daily News* for March 30, 1909, is very significant. It says ;

*"Lord Macaualy's triumph over the Oriental School,... was really the triumph of the deliberate intention to undermine the religious and social life of India...It is no doubt a hard thing to say that this was not merely the consequence of his act but that it was also his deliberate intention, but the...letter written in 1836, to his father shows how behind his splendid phrases, there lay quite a different view."*

**BRITISH POLICIES & JUSTICE**

But alas ! the newly educated Indians, who were coming out of engineered education system had started believing implicitly in the utter lies of equality, fraternity and justice, which the missionaries boast about their religion, or the commitment of a British officer to sense of justice or giving protection to Indian subjects.

Many British officials did believe that India was a country of barbarous

people, where 'law of the jungle' prevailed, where people lacked education and the people were practically bereft of any culture or literature ! Those British officers, who did not agree totally with this view, also wanted a change and the same system of administration and justice , which they were used to in their own country. John Dickinson describes the kind of legal system introduced by the British and the result it produced :

रक्तदाबाचे मूळ कारण कोणतेही असो. दाबनियंत्रण करणाऱ्या प्रणालींना औषधांनी वळवून दाब मर्यादेत ठेवता येतो. हृदय हा तर एक रक्तभिसरण करणारा पंप- एक यंत्रच - मग कवींची त्याबद्दलची कल्पना काहीही असो. तेच फुफ्फुसाचे. हे दोन्ही अवयव बंद ठेवून बाह्य साधनांनी, फुफ्फुस - हृदय यंत्राने (Heart Lung Machine) त्यांचे कार्य चालू ठेवता येते. हृदयरोपणाचेही प्रयोग झाले आहेत. छोट्या प्रमाणावर, वहनक्षमता कमी झालेल्या रक्तवाहिनीला समांतर वाहिनी जोडून (By pass) रक्तपुरवठा अबाधित राखता येतो. थोडक्यात, हे चारही रोग नियंत्रित करणे शक्य आहे. अकार्यक्षम ऊती किंवा अवयवाऐवजी पर्यायी व्यवस्था करता आली, तर धोका कमी होतो किंवा टळतो. प्रत्येक ऊती व अवयवाचे शरीरातील कार्य ठरलेले आहे. कार्याचे स्वरूप व मर्यादा, तसेच इतर ऊतींबरोबर संतुलन हे सर्व पेशीच्या केंद्रातील जनुकांतील संदेशात लिहिलेलेच असते. अशा पेशी मेल्या किंवा अकार्यक्षम झाल्या म्हणजेच संख्यालोप किंवा गुणह्रास या कारणांनी या व्याधी उद्‌भवतात. आपले नियोजित कार्य न करण्यापलीकडे या अकार्यक्षम पेशी इतर काही उपद्रव देत नाहीत. या व्याधींचे पूर्ण जीवनावर काहीही परिणाम होत असले तरी ते केवळ योग्य कार्य न होण्यामुळे असतात. मूळ कारण त्यामानाने साधे असते. याची तुलना अपंगत्वाशी करता येईल. एखाद्याला दूध पचत नाही. कोणाला काठी घ्यावी लागते, तर कोणाला कुबडी; कुणी अंधळा असतो तर कुणी बहिरा. याचप्रमाणे डोळ्यांनी न दिसणाऱ्या, इंद्रियांनी न समजणाऱ्या अकार्यक्षमता आल्यामुळे या व्याधी म्हणजे त्या त्या प्रकारची पंगुता उद्‌भवते. हे सर्व विवेचन करण्याचे कारण असे की नेहमी आपले लक्ष रोगाच्या बाह्य रूपावर म्हणजे लक्षणांवर असते. अनेक उपचारपद्धती लक्षणांनाच रोग समजून आपापल्या परीने उपाययोजना करीत असतात. परंतु रोगाची लक्षणे जाणवली तर ते भाग्यच, कारण अनेक महत्त्वाचे रोग लक्षणहीन असू शकतात. रोगाचे मूळ कारण शोधल्याशिवाय त्यावर उपाय किंवा मात करता येत नाही. डोळ्यांनी न दिसणारी मूळ कारणे तंत्रज्ञानाचा उपयोग करून शोधणे उदा. क्ष-किरण, रक्ततपासणी, जंतुपरीक्षा इ., व त्यानुसार उपाय योजणे हे आधुनिक वैद्यकाच्या यशाचे रहस्य आहे. आतापर्यंत पाहिलेल्या सर्व रोगांहून निराळा एका रोगाचा भस्मासुर आहे. तो म्हणजे - कर्करोग.

### कर्करोग

कर्करोग हा आनुवंशिक किंवा जन्मदोष तर नाही, तो भौतिक कारणे किंवा जंतुसंसर्ग यातून उद्‌भवत नाही. विशिष्ट पेशींच्या केवळ अकार्यक्षमतेमुळेही तो होत नाही. याप्रमाणे आतापर्यंत आपण विचार केलेल्या सर्व रोगांहून तो निराळा आहे. त्याची रूपे व लक्षणे पाहण्याआधी - खरे म्हणजे ही अभावानेच दृश्य असतात - आपण त्याची शारीरिक कारणपरंपरा पाहू.

कर्करोग हा पेशीतील विकृतीमुळे होणारा रोग आहे. ही विकृती अंतिमतः पेशीकेंद्रातील जनुकात झालेल्या बदलामुळे उद्‌भवते, त्यामुळे हा जानुकिक रोग आहे. आपण पूर्वी आनुवंशिक व इतर जन्मदोष पाहिले, तेही जानुकिकच होते. पण कर्करोग हा सहसा जन्मजात नसतो. व्यक्तीच्या पेशीतील जानुकिक बदलांमुळे तो उद्‌भवतो. हे बदल त्या व्यक्तीच्या आयुष्यातच कधीतरी घडून येतात. त्या पेशीच्या प्रजेतही ते बदल उतरतात व विकृत पेशींचा वंश मूळ अविकृत शरीरात सुरू होतो.

मधुमेह इ. मध्येही पेशीकार्य नष्ट होते. हेही जानुकिक बदलामुळे असू शकेल परंतु कर्करोगच्या पेशीतील बदल हे याहून पुष्कळ गंभीर स्वरूपाचे असतात. त्यामुळे विकृत पेशींच्या सर्व गुणधर्मांचा विचार करावा लागतो. (क्रमशः)

•••

*With Best Compliments From*

**Manohar P. Patil**
D. Pharm.
President 93-94

STD 02 522
Tel. : Off.: 31114
Res. : 341189
Fax : 33869

# Vikas Medical Centre

***Off. :*** Dhamankar Naka,
Bhiwandi - 421 302.
Dist - Thane.
***Resi. :*** 'Vrindar' Rahanal Village,
Tal. Bhwandi - 421 305.

हार्दिक शुभेच्छा !

**श्री अनिल रघुनाथ खंडागळे**

रोशनी ट्रान्सपोर्ट कंपनी
विकी टेम्पो सर्व्हिस
ॐ साई कम्युनिकेशन
साईकृपा भवन
मु. पुर्णा, पो. काल्हेर ता. भिवंडी
ठाणे ४२१३०२
फोन : २५२२, ३०४११

*With Best Compliments From*

# KANCHAN Medical Centre

**BAJIRAO V. PATIL**
20, Chudi Mohalla ,
Bhiwandi - 421 302.
Thane - Dist.
Phone : 7114
Res. : 7780

With Best Compliments

From

# Amrita Travels

Thane - 400 601.

# चित्रकार हुसेन यांची सरस्वती व द्रौपदी

दुर्गा भागवत

जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झालेले चित्रकार हुसेन त्यांच्या अनवाणी चालीने आणि त्यांच्या मनमानी चित्रकलेने सर्वांस परिचित आहेत. आता पावेतो त्यांच्या कलेतल्या व आचरणातल्या स्वयंमन्यतेचे कौतुकच लोक सर्वत्र करीत आलेले आहेत. आपल्या स्वेच्छाचारी कलेवर उदंड कमाई या चित्रकाराने केलेली आहे हे कुणीच नाकबूल करू शकणार नाही. पण १९९६ साल असे उजाडले की त्यांच्या चित्रकलेच्या प्रदर्शनात त्यांनी हिंदूंची विद्यादेवता सरस्वती आणि जिच्यामुळे महाभारत घडले अशी पांडवांची पत्नी द्रौपदी ऊर्फ यज्ञातून जन्म पावलेली अशी यज्ञसेनी यांच्यावर चित्रे रेखाटली. त्या चित्रांत त्यांनी त्या दोघींना नग्न आणि बीभत्स अवस्थेत दाखवलेले आहे, यांत शंका नाही. द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याचा खटाटोप कौरवांनी केला तेव्हा श्रीकृष्णाने तिला अपरंपार वस्त्रे पुरवली. पण तिची विटंबना करू पाहणाऱ्यांचा समूळ वंशच्छेद कुरुक्षेत्राच्या लढाईत झाला. सरस्वती ही गणपतीची पत्नी. तिचीही प्रतिष्ठा हुसेननी राखलेली नाही.

टाइम्स ऑफ इंडियाच्या २० ऑक्टोबरच्या अंकाच्या पुरवणीत ही दोन्ही चित्रे दिलेली आहेत. या चित्रांचा यथास्थित समाचार प्रा. वृंदा नाबर यांच्या टाइम्सच्या एका कर्मचाऱ्यांनी घेतलेला आहे. वृंदाबाई यथार्थपणे म्हणतात -की पुरोगामी आणि सेक्युलर ऊर्फ निधर्मवादी मंडळींनी कलाकाराच्या (व लेखकाच्या) स्वातंत्र्याचे जे स्तोम माजवून हुसेन यांना डोक्यावर घेतले आहे ते चूक आहे. कलाकार अगर लेखक यांचे स्वातंत्र्य सांकृतिक कालपरिसराने मर्यादित असते. खजुराहोचे उदाहरण ही हुसेनप्रेमी मंडळी सादर करतात. त्याशिवाय टाइम्सच्या या पुरवणीत एका पुरस्कर्त्याने हुसेन यांनी रेखाटलेल्या सरस्वती आणि एका अकराव्या शतकातल्या दाक्षिणात्य मंदिर शिल्पात तंतोतंत साम्य दर्शवले आहे. वृंदाबाईंच्या मते हे बरोबर नाही. एका कालखंडाची संस्कृती दुसऱ्या बऱ्याच नंतरच्या (म्हणजेच आधुनिक) कालखंडाला जशीच्या तशी लागू करता येत नाही. म्हणून हुसेन यांची ही चित्रे समर्थनीय ठरत नाहीत.

### नग्नता आणि अश्लीलता -

हुसेन यांच्या समर्थकांनी हिंदू परंपरेतील स्त्रीच्या नागडेपणाचे अनेक उथळ संदर्भ दिले आहेत. ते खरे नाहीत असे नाही. त्यांनी शिवाच्या पिंडीचे ही उदाहरण पुढे केले आहे. आता मला व अनेक सुजाणांना दिसलेले शिवलिंग व शाळुंका (योनी) यांचा संदर्भ असा आहे. एकतर शिव व पार्वती ऊर्फ शक्ती ही जगाची मातापितरे मानलेली आहेत. कालिदास देखील रघुवंशात ' जगतः पितरौ वन्दे पार्वती-परमेश्वरौ ' असे म्हणतो. परंतु या दंपतीचे ऊर्फ हिंदूंच्या मायबापांचे मंदिर स्वतंत्र असे दिसत नाही. शिवमंदिरात पिंडीच्या रूपातच त्यांचे प्रतीकात्मक दर्शन होते. त्याला कुणीही मैथुन म्हणून अश्लील मानत नाही. दीर्घ परंपरेने ते भारतभरच नव्हे तर इंडोनेशिया सारख्या भारतीय ऊर्फ हिंदू संस्कृतीने प्रभावित झालेल्या देशात देखील शंकर-पार्वतीच्या एकत्वाचे प्रतीक म्हणून हेच शिवलिंगाचे प्रतीक स्वीकारलेले आहे. हां! आता हुसेनच्या जागतिक संस्कृती ऊर्फ सिव्हिलायझेशन मानणाऱ्या समर्थकांना हे हिंदू प्रतीक चीड आणणारे वाटावे यात नवल नाही. कारण ते शंकराचा 'शंकरराव' व पार्वतीची 'पार्वतीबाई' करून त्यांच्या या प्रतीकाकडे पाहतात. अर्थात तसे केल्याने या प्रतीकाला ते स्वयंकल्पित अश्लीलता जोडून हुसेन यांचा गौरव साधतात.

### मंदिरांवरची संभोगचित्रे

खजुराहो, पुरी इथले जगन्नाथाचे मंदिर व इतरही मंदिरे यांच्यावर अशी चित्रे आहेत हे तर खरेच. पण ही शिल्पे भारतीय शिल्पशास्त्राच्या अनुरोधानेच काढलेली आहेत आणि हे शिल्पशास्त्र प्राचीन आहे हे विसरता कामा नये. या शिल्पांची नक्कल करून आपली आधुनिक मुद्दाम बनवलेली चित्रे आक्षेपार्ह ठरवता येणार नाहीत, हा मुद्दा

वृंदाबाईंनी दाखवून दिल्याप्रमाणे सर्वथा गैरलागू आहे. शिवाय अशा नकली कलेला 'स्वतंत्र कलाकृती' म्हणण्याचे धैर्य कलाकाराने दाखवावे या सारखे हास्यास्पदही काही नाही.

संभोगादि शिल्पे असणारी जी मंदिरे आणि गुंफा आहेत ती सारी ठिकाणे गावे व नगरे यांच्यापासून त्यांच्या निर्मितीपासून दूर होती. या शिल्पांच्या निर्मात्यांना त्यांच्या कृतीतल्या धार्मिक कर्तव्याची जाणीव होती; त्याचप्रमाणे सामान्यजनांच्या मानसिक घडणीचेही त्यांचे भान जागृत होते. या मंदिरांना जाण्यास लोकांना प्रयास पडत.

तरी देखील युंग या जगद्विख्यात मानसशास्त्रज्ञांनी ही शिल्पे पाहिली तेव्हा त्यांच्या युरोपीय नजरेला त्यांच्यातल्या 'अश्लीलतेची' जाणीव होऊन धक्का बसला. तेव्हा त्यांनी याबद्दल आश्चर्य व्यक्त करताच एका तांत्रिकाने त्यांची नीट समजूत केली. ती अशी : 'मंदिरावरची ही शिल्पे मुद्दाम अशा साठी निर्माण केली आहेत. की मंदिरात जाणाऱ्यांनी प्रथम ती पाहून स्वतःच्या मनात कामविकार उत्पन्न होत नाहीत ही खात्री झाल्यावरच शुद्ध व निर्विकार मनाने मंदिरात प्रवेश करून आतील देवमूर्तीची पूजा वगैरे करावी. विकारवश होणाऱ्यांना मंदिरात प्रवेश करण्याचा नैतिक अधिकार नाही.' युंग यांचे समाधान झाले.

नुकतेच एका हुसेन -प्रशंसक महिलेने वेरूळची लेणी पाहिली. त्यात पार्वती-परिणयाचा प्रसंग भव्य शिल्पात दाखवलेला आहे. त्यात पार्वती पूर्ण नग्न असल्याचे पाहून तिला उबग आला असे तिने लिहिले आहे. मीही ते अप्रतिम शिल्प पाहिले आहे. माझे लक्ष त्या जोडप्याच्या नग्नतेवर केंद्रित न होता, पार्वतीच्या समुत्सुक पण नारीसुलभ लाजऱ्या मुद्रेवर केंद्रित झाले. पार्वतीच्या अवयव नि अवयव किती सुभग व सुंदर होता, हेच माझ्या मनात कोरले गेले आहे. तंत्रविद्या किंवा तांत्रिकांची विद्या हे भारतीय संस्कृतीचे भूषण आहे. मद्य, मांस, मासे यांच्या आहाराबरोबर त्यानी 'पंच मकारात' मैथुनाचाही समावेश केला आहे. पण त्याच बरोबर मी तंत्रविद्येवरची बरीच पुस्तके हिंदीत गोपिनाथ कविराजांची व इंग्रजी, त ॲव्हेलॉन यांची वाचली आहेत. त्यावरून त्यांनी मैथुनाशी म्हणजे निर्माणशक्तीशी मरणाचीही गाठ बांधलेली उदा. जीवन, भक्षण, जनन व मरण ही त्यांच्या सर्व आविष्कारात परम भीषण, क्रूर तितकीच कनवाळू असतात हे मला तांत्रिक वाङमयावरून कळले. आसक्ती व भय जिंकून मरण गाठून जे उत्तम मरण येते तेच जीवनाच्या सर्व अवस्थांचे मांगल्य दिग्दर्शित करते असे मला आढळले. याउलट नग्न सरस्वती व द्रौपदी रेखाटणारे हुसेन तांत्रिक कलेच्या सर्वव्यापी सौंदर्याला आणि तिच्यातून उद्भवणाऱ्या सांकेतिक भावनेला एका बिंदूने तरी भिडू शकतात काय ? शकत असते तर त्यांना क्षमायाचनेचा देखावा करावा लागला नसता. सेक्स हा त्यांच्या कलेचा व्यापारी मणका आहे एवढेच. कलाकारांचे स्वातंत्र्य देखील त्या त्या कलेच्या संदर्भाच्या रिंगणापुढे मर्यादित झालेले असतेच. हुसेन आता कितीही दिलगिरी व्यक्त करीत असले तरी या चित्रनिर्मिती मागे निर्मळ कलेपेक्षा सवंगता आणि व्यापारी दृष्टिकोन असण्याची शक्यताच त्यांच्या पूर्वेतिहासावरून दिसते. मूर्ती नामक एका वाचकांच्या शुक्रवार २५ ऑक्टोबर १९९६ च्या 'आफ्टरनून' मध्ये छापलेल्या पत्रात हुसेन यांनी काही वर्षांपूर्वीच्या 'इलस्ट्रेटेड वीकली' मध्ये सीतेच्या काढलेल्या नग्नचित्राच्या संदर्भात त्यावेळी दिलगिरी व्यक्त केली असल्याबद्दल माहिती दिली आहे. जनता घटना लवकर विसरते म्हणूनच हुसेन सारख्यांचे फावते.

जर हुसेन त्यांच्या चाहत्यांच्या सांगीप्रमाणे अमर्याद स्वातंत्र्याचे भोक्ते असतील तर त्यांनी हजरत पैगंबराचे - महंमदाचे-रेखाचित्र तरी सवस्त्र काढून जगाला ते स्वातंत्र्य दाखवून द्यावे.

•••

---


**ही दीपावली आणि नुतन वर्ष**
**आपणांस व आपल्या**
**कुटुंबीयांना सुखसमृद्धीचे**
**आणि भरभराटीचे जावो !**
**ही शुभेच्छा !**

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (३)

## वैदिक भूमिती व वास्तूची आखणी

डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी

भारतीय वास्तुशास्त्राबद्दल माहिती देताना त्यात भूमिती हा विषय कसा अंतर्भूत होऊ शकतो याबद्दलचा प्रश्न तुमच्यापैकी काही जणांच्या मनात उभा राहणे शक्य आहे. तेव्हा प्रथम या शंकेचे निराकरण करू या. अगदी लहान झोपडी जरी बांधावयाची असली तरी तिचे चारही कोपरे हे काटकोनात असणे आवश्यक आहे. झोपडीच्या समोरासमोरील बाजू परस्परांस समांतर असण्यासाठी व झोपडीची एकंदरच मजबुती वाढण्यासाठी ही काळजी घेणे आवश्यक आहे. झोपडी बेढब दिसू नये म्हणूनही याची गरज आहे. आणि झोपडीच्या समोरच्या भिंती परस्परांस समांतर असण्यासाठी किंवा झोपडीच्या एकमेकांस लागून असणाऱ्या भिंती काटकोनात असण्यासाठी त्या झोपडीची आखणी करताना बौधायन सिद्धांताचा म्हणजेच काटकोन त्रिकोणाच्या बाजूंच्या वर्गांचा जो नियम आहे त्याचा उपयोग करणे आवश्यक ठरते. तेव्हा आखणी शास्त्रशुद्ध होण्यासाठी भूमितीच्या कृतींचा (construction) उपयोग करावा लागतो. यासाठी भूमितीतील योग्य अशा प्रमेयांची माहिती असणे आवश्यक आहे. तेव्हा एखाद्या वास्तूची जेव्हा आखणी करावयाची तेव्हा भूमितीच्या ज्ञानाचा उपयोग होतो. किंबहुना भूमितीचे शास्त्र हे वास्तुशास्त्राला पायाभूत असते असे म्हणावयासही हरकत नाही.

भारतीयांनी भूमितीची प्रमेये तसेच अनेक सिद्धांत यांचा अभ्यास व त्यांचा व्यावहारिक उपयोग फार पूर्वीपासून सुरू केला होता.

मानवाच्या इतिहासातील प्रमुख, श्रेष्ठ व अतिप्राचीन वाङ्मय म्हणून वेदांचा उल्लेख होतो. या वेदांना अनुषंगून मात्र यज्ञासाठी, यज्ञ करण्यासाठी ज्या साहित्याची, उदाहरणार्थ ब्राह्मणे, श्रौतसूत्रे इत्यादींची निर्मिती झाली त्यांना वैदिक साहित्य म्हणतात. व ते ज्या काळी निर्माण झाले त्याला वैदिक काळ म्हणतात.

बोधायनांच्या सिद्धांताची सिद्धता त्या काळी त्यांनी कशी केली असेल याबद्दल अनेक विद्वानांनी आपापल्या परीने उत्तरे दिली आहेत. यातील एक सिद्धता खाली दिली आहे. जर्मन विद्वान ब्युर्क (Burk) यांनी सन १९०१ मध्ये हा सिद्धांत बोधायन मुनींस कसा सुचला असावा याबद्दल एक उलगडा, तर्क दिला आहे. त्यासाठी त्यांनी बौधायन सूत्रांचाच आधार घेतला आहे. बौधायन श्रौतसूत्रांत विटांनी बांधावयाच्या एका चौथऱ्याचे वर्णन आहे. हा चौथरा चौरस असून 'अआईई' याचे क्षेत्रफळ चार चौरस पुरुष आहे. या चौरसाच्या चारी बाजूंचे मध्यबिंदू य,र, ल, व, आहेत.




हे मध्यबिंदू जोडून चौरस 'यरलव' मिळतो. चौरसाचे कर्ण 'यल' व 'रव 'आखले असता ते म या बिंदूत परस्परांस छेदतात.

चौरस यआरम , रइलम, लईवम, व वअयम हे समक्षेत्र चौरस असून त्यांचे प्रत्येकी क्षेत्रफळ एक चौरस पुरुष आहे. चार चौरसांनी मिळून चौरस 'अआइई 'बनला आहे असे आपल्याला म्हणता येईल.

चौरस 'यआरम 'चा 'यर' हा कर्ण आहे व चौरस 'यरलव' चा तो पायथा आहे.

चौरस यरलव =

△ यमर + △ रमल + △ लमव + △ वमय बाजू मर वर चौरस 'मरइल' व बाजू 'यम' वर चौरस 'अयमव' आहेत.

चौरस मरइल + चौरस अयमव =

△ रमल + △ रइल + △ वमय + △ अयव

△ यमर + △ रमल + △ लमव + △ वमय =

△ रमल + △ रइल + △ वमय + △ अयव चौरस तेव्हा चौरस यरलव चौरस 'मरइल' चौरस 'अयलव'

बोधायन सिद्धांत वापरून जेव्हा आखणी करताना काटकोन आखावयाचा असतो तेव्हां ३,४,५ या सूत्राचा आपण उपयोग करतो. $३^{२} + ४^{२} = ५^{२}$ आता काटकोन त्रिकोणाच्या बाजूंच्या लांबी शोधण्यासाठी काही सूत्र आहे का ते पाहू. बोधायनांनी असे अनेक आकडे वेदींची आखणी करतांना दिले आहेत. त्यांचे तीन वर्ग पाडता येतात.

| वर्ग १ | वर्ग २ | वर्ग ३ |
|---|---|---|
| ३ ४ ५ | ८ १५ १७ | १५ ३६ ३९ |
| ५ १२ १३ | १२ ३५ ३७ | |
| ७ २४ २५ | | |

वर्ग १ मध्ये काटकोन त्रिकोणाच्या एका बाजूची लांबी व कर्णाची लांबी यांत फक्त एकाचा फरक आहे. वर्ग २ मध्ये दिलेल्या आकड्यात काटकोन त्रिकोणाच्या एकाबाजूची लांबी व त्याच्या कर्णाची लांबी यांत दोनाचा फरक आहे.

वर्ग १ च्या बाबतीत सूत्र मांडता येते ते असे

१२ x १२ + (१२ + १२ + १) = १३ x १३

म्हणजेच $१२^{२} + २५ = १३^{२}$ ∴ $१२^{२} + ५^{२} = १३^{२}$

तेव्हा कोणत्याही काटकोन त्रिकोणात त्याच्या बाजूंची लांबी द्यावयाचे सर्वसाधारण सूत्र येते :

$(क्ष + १)^{२} = क्ष^{२} + २क्ष + १$

समजा क्ष = २४ तर $(२४ + १)^{२} = २४^{२} + २ \times २४ + १ = २४ + ४९$

$(२५)^{२} = २४^{२} + ४९$ ∴ $२५^{२} = २४^{२} + ७^{२}$ :

यावरून असे वाटते की सूत्र $(क्ष + १)^{२} = क्ष^{२} + २क्ष + १$ हे श्रौतसूत्रकारांस, बोधायनांस माहिती असावे.

वर्ग २ मधील आकड्यांसाठी वापरावयाचे सूत्र आहे-

$(क्ष + २)^{२} = क्ष^{२} + ४क्ष + ४$ समजा क्ष=३५

∴ $३७^{२} = ३५^{२} + १४४ = ३५^{२} + १२^{२}$

तेव्हा काटकोन त्रिकोणाच्या बाजू येतात ३७, ३५ व १२. कात्यायन मुनींनी या बोधायन सिद्धांताचा उपयोग समक्षेत्र अनेक चौरसांच्या बेरजेइतके क्षेत्रफळ असलेला चौरस आखण्यासाठी केला होता. समजा चौरसांच्या बाजूंची लांबी 'अ' आहे आणि अशा समक्षेत्र चौरसांची संख्या'न' आहे तर चौरस आखावयाचा की त्याचे क्षेत्रफळ'नअ$^{२}$' येईल.




समद्विभुज △ अबक मध्ये कोन 'अ' हा काटकोन आहे. या शिरोकोनातून बाजू 'बक' वर 'अड 'हा लंब टाकला. या त्रिकोणाच्या बाजूंची लांबी खालील प्रमाणे आहे.

बाजू अब = बाजू अक = $\frac{(न + १)}{२}$ अ

बाजू बक = (न - १)अ

बाजू अडची लांबी काढावयाची तर

$अड^{२} = अब^{२} - बड^{२} =$

$$\left(\frac{(न + १) अ}{२}\right)^{२} - \left(\frac{(न - १) अ}{२}\right)^{२} = नअ^{२}$$

तेव्हा 'अड' लांबी इतकी बाजू असलेला चौरस आखला तर त्याचे क्षेत्रफळ 'नअ$^{२}$'असेल. येथे एक प्रश्न असा तुम्हाला विचारावासा वाटेल की ही कृती करावयाच्या ऐवजी गणिताच्या सहाय्याने समक्षेत्र चौरसांच्या क्षेत्रफळांच्या बेरजेइतके क्षेत्रफळ असलेला चौरसाची बाजू मिळवता येईल. परंतु अचूक लांबी कागदावर गणिताने न मिळविता तो जमिनीवर आखणे हे महत्वाचे आहे. समजा तीन चौरस आहेत ज्यांचे प्रत्येकी क्षेत्रफळ चार चौरस सें.मी. आहे. या तीन चौरसांच्या क्षेत्रफळांच्या बेरजे इतके क्षेत्रफळ असलेला चौरस आखावयाचा म्हणजे ज्याची बाजू$\sqrt{१२}$ सें. मी. आहे असा चौरस आखावा लागेल. याउलट वर दिल्याप्रमाणे त्रिकोण आखून त्याच्या लंबाच्या लांबीइतक्या लांबीची बाजू असलेला चौरस काढला तर त्याचे क्षेत्रफळ अचूक १२ चौ. सें. मी. येईल; हा या कृतीचा फायदा आहे.

बोधायनांनी दोन या आकड्याचे अचूक वर्गमूळ दिले आहे. त्यांना दोनाचे वर्गमूळ पूर्णांकांत असणार नाही याची अर्थातच कल्पना होती. पण त्यांनी वर्गमुळाची किंमत अचूकरीत्या देण्यासाठी जे सूत्र दिले आहे ते त्यांना कसे

सुचले असावे त्याचा विचार करू.

बोधायनांनी दोन च्या वर्गमुळाची किंमत दिली आहे.

$$\sqrt{२} = १ + \frac{१}{३} + \frac{१}{३ \times ४} - \frac{१}{३ \times ४ \times ३४}$$

बिभूतिभूषण दत्त नावाच्या बंगाली संशोधकांनी या सूत्राचा उलगडा दिला आहे.







चौरस 'अआइई 'व चौरस 'यरलव' हें समक्षेत्र आहेत. समजा त्यांच्या बाजूंची लांबी १ आहे. आकृतीत दाखविल्याप्रमाणे चौरस 'यरलव' चे उभे तीन सारखे भाग पाडले. त्यातील तिसऱ्या भागाचे आडव्या रेषांनी पुन्हा तीन भाग पाडले. चौरस 'यरलव' चे भाग I, II, III, हे आकृतीत दाखविल्याप्रमाणे चौरस 'अआइई' भोवती ठेवले. चौरस III2 व III3 यांचे प्रत्येकी चार उभे भाग पाडले ते पुन्हा आकृतीत दाखविल्याप्रमाणे चौरस अआइईच्या वाढलेल्या बाजूंवर ठेवले. चौरस पूर्ण होण्यासाठी लहानसा चौरस म त्यात घातला. नवीन तयार झालेला चौरसाच्या (चौरस पफबईच्या) बाजूंची लांबीयेते $= १ + \frac{१}{३} + \frac{१}{१२}$. मात्र चौरसाचे क्षेत्रफळ मूळ चौरसाच्या (चौरस यरलवच्या) दुप्पट होण्यासाठी चौरस म चे क्षेत्रफळ वजा करावयास हवे. चौरस म चे क्षेत्रफळ आहे $\left(\frac{१}{१२}\right)^२$ समजा चौरस म च्या क्षेत्रफळाइतके एकूण क्षेत्रफळ असलेल्या दोन लांबट पट्ट्या चौरस पफबई मधून काढून टाकल्या. या पट्ट्यांची लांबी आहे $१ + \frac{१}{३} + \frac{१}{१२}$ त्यांची रुंदी क्ष समजू

$$\therefore २क्ष\left(१ + \frac{१}{३} + \frac{१}{१२}\right) - क्ष^२ = \left(\frac{१}{१२}\right)^२$$

$क्ष^२$ ही फार लहान संख्या म्हणून सोडून देऊ.

$$\therefore २क्ष\left(\frac{१७}{१२}\right) = \left(\frac{१}{१२}\right)^२$$

$$\therefore क्ष = \left(\frac{१}{१२}\right)^२ \times \frac{१२}{१७} \times \frac{१}{२} = \frac{१}{१२} \times \frac{१}{१७} \times \frac{१}{२}$$

चौरस पफबई चे क्षेत्रफळ २ आहे.

$$\therefore २ = १ + \frac{१}{३} + \frac{१}{१२} - \frac{१}{१२ \times ३४}$$

$$\therefore २ = १ + \frac{१}{३} + \frac{१}{३ \times ४} - \frac{१}{३ \times ४ \times ३४}$$

अनेक विद्वानांनी या सूत्राचा उलगडा करावयाचा प्रयत्न केला आहे. परंतु वर दिलेला उलगडा हा बोधायनांनी २ ची किंमत ज्या रीतीने काढली असेल त्याच्याशी सर्वाधिक मिळताजुळता असावा असे वाटते.

दुसरी एक पद्धत माहिती आहे, पण त्यासाठी Tannerey's R-Process माहिती असावयास हवी आणि ही पद्धती बोधायनांना माहिती होती की नाही हे आज समजणे अवघड आहे. पण ही पद्धती त्यांना सुचणे सहज शक्य आहे असे समजून त्या पद्धतीनुसार या सूत्राचा उलगडा केलेला आहे. आपस्तंब श्रौतसूत्रांत $१\,^१/_२$ चा वर्ग $२\,^१/_४$ असतो. असे सूत्र दिले आहे. हे येथे लक्षात ठेवावयास हवे. टॅनरीच्या पद्धतीची माहिती असल्याशिवाय हा वर्ग देणे, अशक्य आहे. तेव्हा श्रौतसूत्रकारांना ही पद्धत माहिती असावी असे म्हणण्यास जागा आहे. टॅनरीच्या पद्धतीप्रमाणे

$$(क्ष + {}^१/_२ क्ष)^२ = २क्ष^२$$

# दिवंगत व्यक्तींकडून संप्रेषण : एक नमुनेदार प्रयोग

श्री. वसंत वि. अकोलकर

व्यक्तीच्या मरणोत्तर अस्तित्वाचा प्रश्न बहुधा सर्वांच्याच मनात असतो. या प्रश्नाच्या बाबतीत अनेक अभ्यासकांनी अस्तिपक्षी स्वरूपाचे विविध पुरावे प्रस्तुत केलेले आहेत. त्या पुराव्यांची साधक-बाधक समीक्षाही झालेली आहे. तरीही अद्यापि हा प्रश्न अनिर्णितच गणला जातो. मरणोत्तर अस्तित्वाच्या बाजूने सामान्यतः पुरावा दिला जातो तो असा की, काही व्यक्तींच्या तंद्रावस्थेत (Trance) अथवा कधी कधी जागृत अवस्थेत देखील त्यांच्या तोंडून संप्रेषणे येतात.

मृतात्म्यांशी संपर्क साधणाऱ्या म्हणजेच 'माध्यमांच्या' संपर्क - बैठकांमध्ये (Seances) सामान्यतः माध्यमाच्या समोर दुसरी व्यक्ती बसते, माध्यमांच्या तोंडून येणाऱ्या गोष्टी ऐकते व त्यापैकी कोणत्या गोष्टी स्वतःच्या बाबतीत लागू आहेत ते लगेच सांगते अथवा बैठक संपल्यानंतर सांगते.

अशा प्रकारच्या 'संपर्क बैठकां' च्या बाबतीत काही प्रश्न व शंका उपस्थित करण्यात येत असतात. माध्यमासमोर बसलेली व्यक्ती माध्यमाच्या माहितीची असेल तर ? तिच्या दिवंगत आप्तेष्टांविषयीची माहिति माध्यमास असण्याचा संभव असेल की नाही ? माध्यमाच्या मनात साठल्या गेलेल्या विपुल माहितीच्या आधारे माध्यम विधाने करीत असेल काय ? माध्यम व त्याच्या संमुख बसलेली व्यक्ती या उभयतांमध्ये 'विचार - संक्रमण' (Telepathy) झाल्यामुळे उपस्थित व्यक्तीला ठाऊक असलेली माहिती, माध्यमाच्या मनात येत असेल काय ? माध्यमाच्या द्वारा आलेली विधाने उपस्थित व्यक्तीच्या संबंधात खरी निघणे हा केवळ योगायोग का म्हणू नये ? इत्यादी.

वरील प्रश्नांना व शंकांना वाव राहणार नाही असा व सैद्धांतिक दृष्ट्या महत्वाचा एक नमुनेदार प्रयोग हॅफस्टीन नामक माध्यमाच्या बाबतीत American Society for Psychical Research [ASPR] NewYork च्या प्रयोगशाळेत १५ ऑगस्ट १९७२ रोजी करण्यात आला. तत्पूर्वी, Iceland मध्ये रेजाविक आकाशवाणी केंद्रात काम करणारे श्रीयुत हॅफस्टीन (Hasteinn) या माध्यमाच्या, Iceland मध्ये अनेक बैठका तेथील Society for Psychical Research ने घेतल्या होत्या व अहवाल प्रसिद्ध केले होते. १९४६ ते १९६८ या कालावधीत हॅफस्टीनविषयी कित्येक ग्रंथ देखील प्रसिद्ध झालेले होते. हॅफस्टीन कधी तंद्रावस्थेत जातात व त्या वेळी त्यांचे नियंत्रक (Controls) तसेच अन्य मृतात्मे हॅफस्टीन यांच्या माध्यमातून संप्रेषण करतात. एरवीच्या जागृत अवस्थेत देखील त्यांच्या द्वारा मृतात्म्यांची संप्रेषणे येतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांच्या पुढे बसलेल्या व्यक्तीच्या भोवती त्यांना दिवंगत व्यक्ती 'दिसतात' व त्या दिवंगतांचे स्पष्ट व सविस्तर वर्णन त्यांना देता येते. इतकेच नव्हे तर त्यांना दिसणारे दिवंगत आपापली नावे, इहलोकी वास्तव्य असलेल्या गावांची नावे, आपापल्या घरांची नावे तसेच इतर काही दिवंगतांची नावे सांगतात. हॅफस्टीनच्या समोर बसलेल्या व्यक्तीच्या मागच्या दोन पिढ्यांतील व्यक्तींविषयी व त्यांच्याशी त्यावेळी परिचित असलेल्या व्यक्तींविषयी सांगतात. पूर्वीच्या पिढ्यांतील अशा दिवंगत व्यक्ती बैठकीत बसलेल्या व्यक्तीला ठाऊकही नसतात. परंतु त्या खरोखरीच होऊन गेल्या होत्या व त्यांनी संप्रेषित केलेली माहिति खरी होती असे तपासांती आढळून आले आहे. हॅफस्टीन यांच्या बैठकांमध्ये कधीकधी अनपेक्षितपणे एखाद्या दिवंगताने डोकावणे (Drop in) व जराशा नाखुषीने का होईना स्वतःची माहिती देणे (व ती खरी ठरणे) असा प्रकारही घडलेला आहे.

हॅफस्टीन अमेरिकेस गेले होते. या संधीचा फायदा घेऊन डॉ. इयान स्टीवन्सन व ई. हराल्डस्सन यांनी प्रयोग बैठक आयोजिली. आइसलँडमधून न्यूयॉर्क येथे नुकत्याच आलेल्या तरुणतरुणींची नावे प्रयोगकर्त्यांनी मिळविली. प्रयोग-बैठकीसाठी येण्याची ज्यांनी तयारी दर्शविली त्यांच्यापैकी पहिल्या दहा जणांना निवडण्यात आले. या दहा व्यक्ती प्रयोगकर्त्यांच्या मुळीच ओळखीच्या नव्हत्या.

त्यांची नावे हॅफस्टीन यांनाही सांगण्यात आली नव्हती व त्यांच्यापैकी कोणीही हॅफस्टीन यांच्या ओळखीचे नव्हते.

१५ ऑगस्ट १९७२ च्या दुपारी त्या दहा व्यक्ती ASPR च्या तळमजल्यावर ग्रंथालयात जमल्या. पहिल्या मजल्यावरील प्रयोगकक्षाच्या मध्यभागी पारदर्शक नसलेला जाड पडदा वरपासून जमिनीपर्यंत टांगला होता. हॅराल्डस्सन यांनी पाचव्या मजल्यावरून हॅफस्टीन यांना खाली आणले व ते दोघे पडद्याच्या पलीकडे बसले. त्यानंतर डॉ. स्टीवन्सन यांनी ग्रंथालयातून एकावेळेस एका व्यक्तीस आणून पडद्याच्या अलीकडे बसविले. हॅफस्टीनचा एकही शब्द त्या व्यक्तीला ऐकू येऊ नये म्हणून तिचे दोन्ही कान ear phone च्या प्लगनी बंद केले व मोझार्ट या संगीतकाराची ध्वनिमुद्रित फीत चालू केली. पडद्यापलीकडे हॅराल्डस्सन हे हॅफस्टीन जे बोलत ते ध्वनिमुद्रित करीत. एका व्यक्तीची बैठक संपली की ती घरी निघून जाई व दुसऱ्या व्यक्तीस प्रयोगकक्षात आणून पडद्याअलीकडे बसविले जाई. इअरफोनचे प्लग सैल केले जात नाहीत यावर स्टीवन्सन नजर ठेवून होते.

प्रत्येक व्यक्तीगणिक एक या प्रमाणे एकूण दहा ध्वनिमुद्रित टिपणे झाली. काही दिवसांनी ती अलग अलग लिहून काढून प्रत्येक टिपणाच्या दहा प्रती करण्यात आल्या व सरमिसळ केलेला एकेक संच त्या १० व्यक्तींना देण्यात आला. प्रत्येक जणाने त्यातील कोणते टिपण स्वतःला किती प्रमाणात लागू पडते हे पाहून त्या टिपणांना क्रमांक दिले. टिपणांमध्ये ज्या दिवंगतांची नावे व वर्णन होती त्यांच्याशी स्वतःचा काही संबंध लागत होता काय या विषयीही प्रत्येक व्यक्तीने सांगितले.

पहिला क्रमांक दिला गेलेली चार टिपणे आढळली. दोन टिपणे अशी निघाली की त्यांना दोन व्यक्तींनी दुसरा क्रमांक दिला होता.

हॅफस्टीन यांच्या प्रत्येक टिपणामध्ये ४/५ दिवंगतांचे उल्लेख होते. त्यापैकी एका टिपणात तर ८ मृतांचा निर्देश होता. त्या सर्व दिवंगतांनी स्वतःचे संपूर्ण नाव सांगितले होते. काही टिपणांमध्ये हॅफस्टीन यांनी त्यांना 'दिसत' असलेल्या दिवंगतांच्या चेहरेपट्टीचे व शरीराचे वर्णन; त्यांच्या मृत्यूचे कारण, तसेच त्यांच्या नातेवाइकांची नावे वगैरे माहिती दिली होती, व ती बरोबर असल्याचे तपासांती निष्पन्न झाले.

हॅफस्टीन यांच्या पुढील पडद्यापलीकडे एका नंतर एक याप्रमाणे बसविलेल्या त्या १० जणांपैकी काही जणांनी, त्यांच्या बाबतीतल्या टिपणात उल्लेख झालेले दिवंगत त्यांच्या माहितीचे नव्हते असे सांगितले. म्हणून ती टिपणे घेऊन हॅरॉल्डस्सन आईसलंडला गेले व त्या व्यक्तींच्या नातेवाइकांना भेटले. टिपणांतील माहिती बरोबर असल्याचे आढळले. पुढील उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल ;

कुमारी E नामक तरुण मुलगी हॅफस्टीनसमोर पडद्याआड बसली असताना ते बोलत गेले ते असे :

" एक पन्नाशीचा इसम येतो आहे. त्याची उंची मध्यम आहे. खांदे रुंद व बांधा मजबूत आहे. तो शांत परंतु निश्चयी वृत्तीचा आहे. तो सांगतो आहे 'माझे नाव थोरडूर थोरस्टीन्स्सन आहे'. ह्या इसमाबरोबर एक वृद्ध स्त्री येते आहे. गुड्ब्जोर्ग (Gudbjorg) ... या दोघांना पडद्याआड बसलेली व्यक्ती तिच्या लहानपणापासून माहीत आहे. थोरडूर अचानक मरण पावला. ... एक तिसरा माणूसही इथे आहे. तोही या व्यक्तीस ओळखतो. तो सरासरी उंचीचा आहे. सडपातळ आहे. त्याचा चेहरा उभट आहे. गुणलागूर जोन्सन (GunnLagur) हे स्वतःचे नाव तो सांगतो आहे. (हे बोलता बोलता हॅफस्टीन म्हणाले ) 'मला गुदमरल्यासारखे होत आहे... होय, या माणसाच्या श्वासनलिकेत काही तरी झाले व तो मृत्यू पावला ... या सडपातळ माणसाबरोबर दोन वयस्कर व्यक्ती , एक वृद्ध स्त्री व एक पुरुष येत आहेत. ह्या सडपातळ इसमाचे ते आईवडील आहेत. त्यांच्या घराचे नाव 'ब्रदर्स पार्ट' आहे, ते घर रेजाविक नजीकच्या छोट्या गावात आहे, आणि त्या घरात जोन (Jon) रहात होता असे ते सांगत आहेत."

वरील टिपणातील कोणाही व्यक्तीस कुमारी E ओळखू शकली नाही. हॅराल्डस्सन यांनी आइसलॅंडला जाऊन ते टिपण E च्या आईवडिलांना दाखविले. त्यांनी व कुटुंबातील इतरांनी 'थोरडूर थोरस्टीन' हे नाव व 'गुड्ब्जोर्ग' हे त्याच्या आईचे नाव तत्काळ ओळखले. थोरडूर हा

खरोखरच मध्यम उंचीचा व मजबूत बांध्याचा होता व आईसह रेजाविक जवळील Patreksfjordur या गावी रहात असे. त्याने कुमारी E च्या आजोबांच्या बहिणीशी लग्न केले होते. त्याची नाव बुडून तो १९४८ मध्ये मरण पावला होता. त्याची आई गुड्ब्जोर्ग वयाच्या ९३ व्या वर्षी १९४३ मध्ये वारली होती. कुमारी E चे वडील गुणलागूर जोन्सन व त्याचे वडील जोन ही नावे ओळखू शकले नाही. परंतु हॅराल्डस्सन यांना रेजाविकच्या समुद्र किनारपट्टीवर 'ब्रदर्स पार्ट' या नावाची दोन घरे सापडली. त्यांपैकी एक घर Akrancs खेड्यात आहे. त्या घरात गुणलागूर रहात असे व तो १९६२ मध्ये वारला ही माहिती मिळाली. रेजाविक येथे त्याच्या भावाचाही तपास लागला व त्याने सांगितले की गुणलागूरच्या घशात अन्नाचा घास अडकल्यामुळे श्वास कोंडला जाऊन त्याचा मृत्यू झाला होता. गुणलागूर व कु. E च्या आजोबांची ओळख होती.

✡ हॅफस्टीनसमोर पडद्याआड एका तरुण महिलेस बसविले होते. तिने एका रशियन तरुणाशी विवाह केला होता. तिच्यासंबंधीच्या टिपणात दिवंगत झालेल्या काही रशियनांची व काही अन्यभाषिक दिवंगतांची नावे होती. या तरुणीस ही नावे ओळखीची वाटेनात. परंतु आइसलंडमध्ये तिच्या आईवडिलांना ते टिपण दाखवले तेव्हा रशियन नसलेले दिवंगत त्यांच्या ओळखीचे निघाले.

✡ पडद्याआड बसविलेल्या दुसऱ्या एका तरुणीच्या संबंधात असलेल्या टिपणात नामनिर्दिष्ट झालेले दिवंगत तिला ठाऊक नव्हते. परंतु तिच्या कुटुंबियांच्या परिचयाचे होते असे तपासांती निष्पन्न झाले.

✡ पडद्याआड बसविलेल्या एका व्यक्तीने तिजविषयी आलेल्या टिपणात आलेले एका दिवंगताचे संपूर्ण नाव परिचित असल्याचे सांगितले. त्याच टिपणामध्ये ज्या आणखी एका दिवंगताचा नामोल्लेख होता तो दिवंगत मात्र ह्या व्यक्तीला बिलकूल माहीत नव्हता. परंतु तपासांती आढळले की तो पहिल्या दिवंगताचा सहकारी होता आणि त्या दोघांचा मृत्यू एकाच अपघातात झाला होता.

✡ एका टिपणामध्ये दोन दिवंगतांचा उल्लेख होता. त्या टिपणाशी संबंधित असलेला तरुण त्या दोघांनाही ओळखत नव्हता. परंतु तपासांती असे आढळलेकी ते दोन्ही दिवंगत त्या तरुणाच्या मेव्हण्याच्या ओळखीचे होते, व नुकतेच निधन पावले होते. त्यांपैकी एकजण त्या मेव्हण्याबरोबर काम करीत असे व दुसऱ्या इसमाच्या मृत्यूनंतर त्याच्या जमीनजुमल्याची व्यवस्था या मेव्हण्याने लावून दिलेली होती. त्या तरुणास बिलकूल माहीत नसलेल्या दिवंगतांचा उल्लेख हॅफस्टीन यांनी केला ही गोष्ट महत्वाची आहे कारण त्या तरुणाच्या स्मृती अथवा विचार हॅफस्टीन यांच्या मनात संक्रमित झाले असतील (टेलेपथी) हे स्पष्टीकरण गैरलागू ठरते.

पडद्याआड बसलेल्या व्यक्तीचे नाव हॅफस्टीन यांना सांगितलेले नव्हते व त्यांच्या दृष्टीसही ती व्यक्ती पडत नव्हती. त्यामुळे त्या व्यक्तीच्या कुटुंबातील दिवंगत झालेल्यांची माहिती हॅफस्टीन यांना आठवली असेल असे कोणास म्हणता येणार नाही.

टिपणामध्ये आलेली दिवंगतांची नावे, गावे, घरे व त्यांचे मृत्यू इत्यादी माहिती वस्तुस्थितीशी तंतोतंत जुळली हा केवळ योगायोग होय असे काही लोक म्हणतील. परंतु दहापैकी दहा टिपणांचा योगायोगाने वस्तुस्थितीशी मेळ बसू शकतो असे म्हणणे म्हणजे 'योगायोग' ही कल्पना भलतीच ताणणे होय. हॅफस्टीन यांच्या (व त्यांच्यासारख्या इतर व्यक्तींच्या ) माध्यमांच्या (mediums) बाबतीत विचारार्ह अशा दोनच उपपत्ती उरतात. अशा 'माध्यमां' च्या मनःचक्षूंना दिवंगत व्यक्ती खरोखरच दिसतात व त्या स्वतःविषयी सांगतात ही एक शक्यता. दुसरी शक्यता म्हणजे अशा 'माध्यमां' ना अतींद्रियरीत्या भूतकालातील व्यक्तीविषयी ज्ञान (ESP) होत असेल, तरीपण दृष्टीआड बसलेल्या व्यक्तीशी ज्यांचा संबंध पोहोचतो नेमके तेच दिवंगत हॅफस्टीनसारख्या माध्यमांच्या मनःचक्षूंपुढे का यावेत हा प्रश्न उरतोच. हॅफस्टीन यांचा स्वतःचा अनुभव असा आहे की काही वेळा अनेक दिवंगतांचा घोळका जमतो. तसेच काही दिवंगत रेंगाळत राहतात त्यामुळे माध्यमाच्या मनात गोंधळ होतो. हा अनुभव ध्यानी घेता माध्यमासमोर पडद्याआड बसवलेल्या व्यक्तीची बैठक आटोपल्यानंतर काही वेळ जाऊ देणे व मग दुसऱ्या व्यक्तीस आणून बसवणे ही पद्धत चांगली.

•••

# महिनाभरातील घडामोडी

श्री. मोहन पाठक

उशिरा सुरू झालेले अकरावीचे वर्ग व त्यामुळे कधी एकदाचं कॉलेज चालू होतंय याची वाट पाहणारी नवीन चेहऱ्यांची उत्सुक मुलं यांची वर्दळ तर सुरू झाली. साहजिकच कँटीन उत्साहाने भरलेल्या मित्रमैत्रिणींच्या घोळक्यांमुळे हाऊसफुल व्हायला सुरुवात झाली. एकांकिका -स्पर्धांचे दिवस असल्याने महाविद्यालयातील नाटकवाल्या ग्रुपची सभागृहात तालमींसाठी रेंगाळणारी गर्दी वाढू लागली. वक्तृत्व, कथाकथनादी स्पर्धांच्या सूचनांनी, आवाहन-पत्रांनी सूचनाफलकांवर गर्दी सुरू केली आणि पाहता पाहता फर्स्ट टर्म संपायलाही आली. केटीच्या परीक्षा, टर्मिनल यामुळे ग्रंथालयांचे उंबरठे झिजायला सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर पाच सप्टेंबर ते पंधरा ऑक्टोबरच्या कालखंडाची ही खबरबात-

कला वाणिज्य महाविद्यालय

पाच सप्टेंबरला महाविद्यालयात दोन 'दिन' साजरे झाले. त्यातला पहिला म्हणजे शिक्षक- दिन. खरे तर हा दिवस विद्या प्रसारक मंडळ या आमच्या संस्थेने एकत्रितपणे करावा असे आपले मला वाटते. सर्व घटकसंस्थांतील अध्यापक अध्यापकेतर यांच्यासाठी मोठा आणि भारदस्त कार्यक्रम झाला तर ... हा विचार माझ्या मनात नेहमी येतो. तर कला वाणिज्य महाविद्यालयातील शिक्षक-दिनाबद्दल.



या दिनानिमित्ताने अर्थशास्त्र विभागातले प्रा. धोपेश्वरकर यांचा विशेष गौरव केला गेला. मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्रविभागाचे डॉ. एम्. जे. एम्. राव यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून त्यांनी "डेव्हलपमेंट प्रोसेसेस अँड पॅटर्न्स अ कंपॅरेटिव्ह स्टडी" हा प्रबंध सिद्ध केला. याबद्दल त्यांना मुंबई विद्यापीठाची पीएच्.डी. मिळाली. अभिनंदनीय, अभिमानास्पद अशा या घटनेबद्दल त्यांचा हा हार्दिक गौरव होता. त्यांनी आपल्या संशोधनाची माहिती यावेळी दिली. यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम प्राध्यापकांनी सादर केले. प्रा. डी. एस्. व प्रा. वाय्. बी या भिडेद्वयांने सादर केलेल्या कविता, घरगुती प्रसंगांवर आधारित असे प्रा. सौ. रोझ, प्रा. राणी बाजपेयी व रूपाली वाळुंजकर यांनी सादर केलेले किस्से, प्रा. अनिल भावड यांनी सांगितलेले जोक्स यांमुळे मनोरंजनाच्या या कार्यक्रमात रंगत आली. प्रा. बच्छाव यांनी मराठी गझला सादर केल्या.

या अनौपचारिक कार्यक्रमाआधी याच दिवशी संपन्न झालेला दुसरा 'दिन' म्हणजे सद्भावना दिन. यात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांमधील विद्यार्थ्यांची गीते व नृत्ये झाली. प्रा. वाय्. बी. भिडे व विद्यार्थी केशव पाटणकर यांनी सद्भावनेसंबंधात विचार व्यक्त केले. या समारंभाचे खास अंग म्हणजे 'छत्रपती पुरस्कार' मिळविणाऱ्या पाच जुन्या विद्यार्थ्यांचा झालेला गौरव. यात क्लॅरिन मेंझिस व शिबू जॉर्ज (बास्केट बॉल), मीनल सावंत (कबड्डी), अनुजा तरे (नेमबाजी) व नगरसेवक श्री. कृष्णकुमार कोळी (खो खो मधील संयोजनकौशल्य )यांचा समावेश होता.

सर्पप्रदर्शन

साप म्हटला की सर्वांनाच विलक्षण कुतूहल असते. महाविद्यालयातील निसर्ग -मंडळाने या दृष्टीने सात सप्टेंबर रोजी सर्प मित्र संघटनेचे कैलास दरोळे यांच्या सर्पप्रदर्शनाचे सभागृहात आयोजन केले. तीन रुपये असे नाममात्र प्रवेशशुल्क होते. या निमित्ताने काही चित्रपारदर्शिकांचाही कार्यक्रम झाला. प्रदर्शनास मिळालेला प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक होता.

लागोपाठ झालेल्या पुढील कार्यक्रमांत 'महिलांकरिता व्यवसाय मार्गदर्शन' या कार्यक्रमाचा समावेश होता. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत झालेल्या या प्रॉक्टर अँड गॅंबलच्या कार्यक्रमास सुमारे दोनशे विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत 'बंध हे नात्यांचे' ही एकांकिका विद्यार्थ्यांनी सादर केली. पहिल्या फेरीत एकांकिकेस तृतीय पारितोषिक, धनंजय कुलकर्णी व

गीता भावसार यांना अभिनयाचे प्रथम पारितोषिक तर अनुया मुर्डेश्वरला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

### पशुपक्ष्यांची भाषा

मराठी वाङ्मय मंडळाने या विषयावर आयोजित केलेले डोंबिवलीचे श्री. बाळ बेंडखळे यांचे व्याख्यान अतिशय उल्लेखनीय होते. वेगळा व उत्सुकता वाढवणारा असा विषय असल्याने कार्यक्रमाला भरपूर गर्दी होती. आपण अनुभवलेले पशुपक्ष्यांचे संवेदनाविश्व श्री. बाळ बेंडखळे यांनी अतिशय प्रभावीपणे आपल्या व्याख्यानातून साकार केले.

या सर्व कार्यक्रमांना प्राचार्य स.वा. गोखले, उपप्राचार्य प्रकाश शिंदे व वि.गो. नंद यांचे मार्गदर्शन लाभले होते.

### बॅडमिंटन मधील यश

महाविद्यालयाच्या मयूर धाटणेकर व संपदा शेट्टी या बॅडमिंटन जोडीने महाविद्यालयाच्या परंपरेत लक्षणीय भर टाकली. अलीकडेच संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत त्यांना विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळाले. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या बॅडमिंटन सामन्यात संपदाने निकराची झुंज दिली तर मयूरला मात्र पहिल्या फेरीत माघार घेतल्यानंतर जबरदस्त झुंज द्यावी लागली. अंतिम फेरीत मात्र त्यांनी प्रतिस्पर्धी खेळाडूंना नामोहरम केले.

बॅडमिंटन मार्गदर्शक श्री. वाड यांच्या प्रयत्नांना मिळालेले हे यश आहे.

### बांदोडकर महाविद्यालयातील खबरबात

अकरावीतील विद्यार्थ्यांचे परंपरागत पद्धतीने माहितीपूर्ण व्याख्यानाने स्वागत करण्याचा छोटासा, अनौपचारिक कार्यक्रम झाला. प्राचार्य सी. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना सर्व माहिती दिली. कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. दीक्षित सर व उपप्राचार्य सी. म. सारंग , प्रा. अत्तरदे व इतर सहकारी शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बारावीत शिकणाऱ्या सीमा बोराडेने ज्युडो कराटेमध्ये अतुलनीय अशा यशाचे टप्पे पार केले. राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत 'ओपन वेट' या गटात तिला सुवर्णपदक मिळाले, ४५ किलोखालील स्पर्धेत रौप्यपदक मिळाले तर जिल्हास्तरीय आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत तिने प्रथम क्रमांकाचा मान पटकावला. सीमाची या क्षेत्रातील प्रगती अत्यंत स्पृहणीय आहे कारण नंतर लगेच नाशिकला झालेल्या विभागीय स्तरावरील स्पर्धेत ४५ किलोखालील गटात तिने सुवर्ण पदक मिळवले व आता तिची निवड आंतरविभागीय स्पर्धांसाठी झाली असून २५ ते २८ ऑक्टोबरच्या सुमारास ती अकोल्याला जाणार आहे.



बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणून अलीकडेच नेमणूक झालेले रसायन शास्त्र विभागाचे प्रमुख व ज्येष्ठ प्राध्यापक सी. म. सारंग यांना मुंबई विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळाली. सारंगसरांनी सॉलिड स्टेट केमिस्ट्रीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान करू शकेल असा विषय संशोधनासाठी निवडला होता. 'स्टडीज इन मिक्स्ड मेटल ऑक्साइड सिस्टिम्स' हा त्यांचा विषय होता व याकरिता मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स चे डी. व्ही. एस. दर्शने यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले होते.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ग. त्रिं. दाभाडे यांना एक ऑक्टोबर ९६ रोजी ठाणे महानगरपालिकेतर्फे 'महापौर पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. दाभाडेसरांचे हार्दिक अभिनंदन. खंडाळा व महाबळेश्वर परिसरात आढळणारे शेवाळे (Mosses) व त्यांचे पर्यावरणावरील संतुलन या विषयावर डॉ. दाभाडे यांनी १९७५ साली जे संशोधन केले त्यासंबंधात हा पुरस्कार आहे. गेली २५ वर्षे शेवाळे हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. डॉ. दाभाडे पीएच. डी. चे मार्गदर्शक असून आजवर त्यांच्या १२ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी मिळाली आहे.

अमळनेर येथे झालेल्या विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी

संमेलनात महाविद्यालयातून संयुजा तर्फे मिलिंद भलगे व आविष्कार भोईर यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

### शाळेतला शिक्षक- दिन

शिक्षक- दिनानिमित्ताने शाळेमध्ये विद्याप्रसारक मंडळातर्फे शिक्षक दिनाचा सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी २०० शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ. धों. टिल्लू यांनी स्वागतपर भाषण केले. या कार्यक्रमास उपस्थित असणारे विख्यात उद्योगपती श्री. अरुण आठल्ये यांचा परिचय डॉ. बेडेकर विद्यामंदिर चे माजी मुख्याध्यापक श्री. अशोक चिटणीस यांनी करून दिला. याप्रसंगी आनंदीबाई जोशी विद्यालयातील शिक्षिका सौ. स्नेहल फाटक व सौ. हरदीप कौर यांचा दहा वर्षे सेवा झाल्याबद्दल, व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या सौ. विजया कानडे यांचा गौरव करण्यात आला. श्री. अरुण आठल्ये यांच्या डॉ. राष्ट्रपतींच्या जीवनसंदर्भातील उपयुक्त भाषणानंतर, समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणारे संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले.

विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या आभारप्रदर्शनानंतर सौ. वीणा जोशी यांनी पसायदान सादर केले. डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या माध्य. विभागातील सौ. केळकर बाईंनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### सौ. आनंदीबाई जोशी विद्यालयाचे नेत्रदीपक यश

अलीकडेच कुमार कला केंद्राची ३२ वी आंतरशालेय एकांकिका स्पर्धा संपन्न झाली. त्यात आपल्या सौ. आनंदीबाई जोशी विद्यालयाने दणदणीत यश मिळविले.

शाळेच्या पूर्वप्राथमिक विभागाने सादर केलेली 'हिमगौरी आणि सात बुटके' ही एकांकिका सर्वप्रथम आली. ऋचा टिपणीस हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक तर सौ. विशाखा देशपांडे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. माध्यमिक विभागाची 'परि मन आभाळा एवढं' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट ठरली तर सौ. अपर्णा भोळे यांना सर्वोत्कृष्ट लेखनाचे व सौ. मनीषा साळी यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले.



शिक्षक विभाग - मन होवो ज्वालाग्राही

कलाकार डावीकडून - विशाखा देशपांडे, शिल्पा भांगले, मनाली देवधर, मनीषा साळी,

मध्यभागी - वृषाली नारगोळकर

शिक्षकांनी सादर केलेल्या 'मन होवो ज्वालाग्राही' या एकांकिकेस सर्वप्रथम एकांकिकेचा पुरस्कार मिळाला. सौ. अपर्णा भोळे यांचा अभिनय सर्वोत्कृष्ट ठरला तर सर्वोत्कृष्ट लेखिका व दिग्दर्शिका म्हणून सौ. सुमेधा कुलकर्णी यांना पारितोषिक मिळाले. सौ. मनाली देवधर व कुमारी वृषाली नारगोळकर यांना अभिनयाची विशेष प्रशस्तिपत्रके मिळाली.

या सर्व एकांकिकांकरिता श्री. संजय बोरकर सौ. हर्षदा बोरकर यांचे विशेष साहाय्य शाळेला झाले. मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी सर्वांचे खास अभिनंदन केले आहे.

• • •

पान क्र. २३ वरून

**British Policies & Indian Culture**

is not a religion confined to one book and one prophet. It neither depends for its protection on any individual sect or nation. nor it vows to protect any sect or nation, The principles of Hindu *Dharma* are not different in any way from human experiences. These principles are eternal.

The problem is that the Hindu *Dharma* can never be effaced. It is we who may get effaced, if we do not take shelter of these eternal principles for our own protection and identity. And for the same identity and protection we have to see that our history and our values are not distorted.

These articles of Shree Jeevan Kulkarni should not only kindle interest in the past but also lead the reader to right thinking and action.

• • •


हार्दिक शुभेच्छा !



**श्री. मंगेश कोळी**

उपाध्यक्ष

ठाणे जिल्हा समाज कोळी

ठाणे

*With Best Complimentas*

*From*



M/s. PRAGATI TRANSPORT COMPANY

K-4, Sitaram Bldg.,

Palton Road, Mumbai - 400 001.

Tel. No. : 3446021/344 5583

"PRAGATI" WHEELS OF PROGRESS

*With Best Complimentas*

*From*



**Premier Road Carriers Ltd.,**

408, Ashirwad Bldg;

Ahmedabad Street,

Mumbai -400 009.

हे हात शुभंकर शुभचिंतनाचे...

दीपावलीच्या ह्या शुभप्रसंगी

आपले ऋण व्यक्त करणारे हे

हात... हे हातच

घडवतील एक आस्थानी

संबंधांचा, प्रगतीचा सेतू...
ज्यातून आकार घेईल

एक भरभराटीचा मार्ग

उद्याचा... जो देईल

आपल्याला एक सर्वगुणसंपन्न

भारत !




चला या हातांना बळकट करूया !

भारत सहकारी बँक लि.

'शततारका', बाजीप्रभू देशपांडे मार्ग, विष्णुनगर, ठाणे ४०० ६०२.

दूरध्वनी : ५४२ ९४ ३२/३३, ५३३ ५२ ३७, ५३४ ६२ ६७, ५४२ ९४ ३१